दैनिक
# समर्थ राजयोग
SAMARTH RAJYOG
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
वैभव विवेक स्वामी
संपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी वर्ष - ५ वे अंक -१०३ गुरुवार,दि.१९ डिसेंबर २०२४ 98 22 62 85 21 आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू । पाने ४
Beed Daily Marathi Year-5th Issue-103 Thursday, Dt.19 December 2024 98 22 62 85 21 RNI - MAHMAR/2020/79801 Price 3 Rs. Pages 4

## गेट वे हून एलिफंटाकडे जाताना बोट उलटली; घटना दुर्दैवी

नागपूर ।प्रतिनिधी

मुंबई येथील गेट वे हून एलिफंटाकडे जाताना बोट उलटली. ही घटना अतिशय दुर्दैवी व दुःखद आहे. अंदाजे सात ते आठ जण बेपत्ता आहेत. त्यांचा शोध सुरु आहे. दुर्घटनाग्रस्तांना योग्य मदत करण्यात येईल असे, निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत केले. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बोटीतील लोकांना मदत वेळेवर पोहोचल्यामुळे त्यांना वाचवता आले. या घटनेची अधिकची सविस्तर माहिती घेतली जाईल. दुर्घटना ग्रस्तांना योग्य ती मदत दिली जाईल.

# मुंबई बोट अपघातात तीन नव्हे तर १३ जणांचा मृत्यू

## नवीन इंजिनची टेस्टिंग सुरू असताना नेव्हीची बोट आपटली

मुंबई : एलिफंटाकडे जाणाऱ्या बोटीच्या दुर्घटनेसंबंधी एक मोठी माहिती समोर आली आहे. या अपघातात तीन नव्हे तर १३ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती नौदलाने दिल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. मृतांमध्ये १० जण प्रवाशी आणि तीन नेव्हीचे कर्मचाऱ्यांचा समावेश आहे. या अपघातात दोन गंभीर जखमींवर नौदलाच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. ही आकडेवारी अंतिम नसून, यामध्ये अद्याप कुणी बेपत्ता असेल किंवा मृत असेल त्याची माहिती गुरुवारी सकाळपर्यंत मिळेल अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली. या प्रकरणाची चौकशी आता मुंबई पोलिस आणि नौदलाकडून करण्यात येणार आहे.

ज्या १३ जणांचा मृत्यू झाला आहे त्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी ५ लाखांची मदत ही मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून करण्यात येणार असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितलं.

नेव्हीच्या ज्या बोटीने नीलकमल या बोटीला धडक दिली तिच्या संबंधी मोठी माहिती समोर आली आहे. या बोटीच्या नवीन इंजिनचे टेस्टिंग सुरू होते. त्यामुळे ही बोट समुद्रात आठ या आकारात फिरत होती. त्याचवेळी एक राऊंड मारून आलेल्या या बोटीने समोरून नीलकमल या बोटीला धडक मारली.

नवीन इंजिनमध्ये काहीतरी तांत्रिक बिघाड झाल्यानंतर या बोटीवरचे नियंत्रण सुटले आणि तिने



नीलकमल या बोटीला समोरून धडक दिल्याची माहिती नेव्हीने दिली आहे. सकाळी मृतांची अंतिम आकडेवारी समोर येणार

मुंबईच्या गेट वे ऑफ इंडियातून एलिफंटाकडे जाणाऱ्या प्रवाशी नीलकमल बोटीला नौदलाच्या वेगवान स्पीड बोटीची धडक बसली आणि प्रवाशांची बोट उलटली. अपघातावेळी बोटीमध्ये शंभरहून अधिक प्रवासी आणि ५ बोटीचे सदस्य होते. समुद्रात आजूबाजूला असलेल्या इतर बोटींनी मदतीसाठी वेळीच धाव घेतल्यामुळे ११० प्रवाशांचे प्राण वाचवण्यात यश आलं आहे.या घटनेत १३ जणांचा मृत्यू झाला आहे. रात्र झाल्यामुळे शोधकार्य थांबवलं आहे.

# बीड मतदारसंघातील महत्वाच्या प्रश्न आ.क्षीरसागरांनी अधिवेशनात मांडले

## शहरातील पाणीपुरवठा, बंधारा, टुकूर प्रकल्पाबाबत केल्या मागण्या

नागपूर ।प्रतिनिधी

बीड मतदारसंघातील अत्यंत महत्त्वाच्या आणि लोकांच्या दृष्टीने उपयुक्त परंतु प्रलंबित असलेले प्रश्न आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.१८) रोजी नागपूर येथे सुरू असलेल्या विधीमंडळाच्या हिवाळी अधिवेशनात मांडले. बीड शहरातील अनियमित पाणीपुरवठ्याचा प्रश्न, खांडेपारगाव येथील टुकूर साठवण तलाव प्रश्न आणि शहरातील बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल बांधणी करणे हे महत्वाचे विषय मार्गी लावण्याबाबतची मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी सभागृहात औचित्याच्या मुद्यांद्वारे केली.

आ.संदीप क्षीरसागर केलेल्या मागण्या-बीड शहर पाणीपुरवठा

बीड शहराची लोकसंख्या ३ लाख आहे. बीड शहरात सध्या कार्यरत असलेली पाणीपुरवठा





योजनेची यंत्रणा ही अनेक वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळे बीड शहराला पुरेसे पाणी उपलब्ध होत नाही. परंतु बीड शहराला पाणी न मिळण्याचे नेमके हे नाही, बीड शहराच्या आवश्यकतेनुसार पाणीपुरवठा करण्यासाठी अटल अमृत योजनेचे काम पूर्ण झालेले आहे. परंतु बीड नगरपालिकेकडे महावितरण कंपनीचे ३६ कोटी रुपये इतकी वीजबिल थकबाकी असल्याने या योजनेसाठी महावितरण कडून नवीन कनेक्शन दिले जात नाही आणि परिणामी बीड शहराला १५ ते २० दिवसांतून एकदा पाणी पुरवठा होतो, तेही पाणीसाठा मुबलक असताना आणि यंत्रणा तयार असताना. त्यामुळे शासनाने नगरपालिकेकडे असलेले थकीत वीजबिल भरण्यासाठी विशेषबाब म्हणून निधीची तरतूद करावी.

-टुकूर साठवण तलाव

बीड मतदारसंघात टुकूर साठवण तलाव प्रकल्पाची २००३ साली मंजुरी झालेली आहे. परंतु या परिसरातील गावांचा या प्रकल्पाच्या भूसंपादनाला विरोध असल्यामुळे हा प्रकल्प इतक्या वर्षांपासून रखडलेला आहे. यातून मार्ग म्हणून साठवण तलावाच्या ऐवजी नदीवर ४ निम्न पातळी बंधारे जर बांधले तर तितक्याच क्षमतेची पाणी साठवणूक होणार आहे.

### बिंदुसरा नदीवरील बंधारा कम पूल

बीड जिल्ह्यात पावसाचे प्रमाण हे अनियमित असते. कधी अतिवृष्टी तर कधी दुष्काळ अशी परिस्थिती बीडमध्ये असते. दुष्काळात तर साहजिकच पाणीपातळी खालावते आणि शहरातील व परिसरातील विहीर आणि बोअर कोरड्या पडतात. परंतु मुबलक पाऊस पडल्यानंतर देखील पाणी अडविण्यात नसल्याने त्या पाण्याचा उपयोग होत नाही. शहरातून जाणाऱ्या बिंदुसरा नदीवर पूल कम बंधारा बांधण्याबात गेल्या अनेक दिवसांपासून पाठपुरावा आणि मागणी सुरू आहे. हा पूल कम बंधारा बांधल्यानंतर एखाद्या वेळी पाऊस जरी पडला नाही, तरीदेखील अडविलेल्या पाण्यामुळे ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरातील विहीरींना आणि बोअरला पाणीसाठा उपलब्ध राहील. या बंधार्याची मंजुरी अंतिम टप्प्यात आहे. त्यामुळे या महत्वाच्या कामाला शासनाने मंजूरी आणि निधी उपलब्ध करून द्यावा.



## शिवसमर्थ मूळव्याध हॉस्पिटल बीड येथे गरजवंत रुग्णाची मोफत शस्त्रक्रिया

बीड ।प्रतिनिधी

बीड येथील सौ. विजया सानप ३७ वर्ष यांना ५ वर्षापासून सतत पोट साफ न होणे, व 'फिशर या आजाराचा त्रास होता. रुग्णाची आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्या कारणाने शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटलच्या सुप्रसिध्द महिला मुळव्याध तज्ञ डॉ. मीरा प्रशांत ढाकणे (नागरे) यांनी सौ. विजया सानप यांची फिशरची मोफत शस्त्रक्रिया केली व त्यांना या आजारापासून मुक्त केले.याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## ऋषिकेश राठोड वैद्यकीय अधिकारी;एका तांड्याची आदर्श मुहूर्तमेढ

बीड (प्रतिनिधी)

बीड तालुक्यातील लक्ष्मी तांडा येथील रहिवासी तथा जिल्हा परिषदेचे शिक्षक अंकुश राठोड यांचे चिरंजीव डॉ. ऋषिकेश राठोड यांची गेवराई तालुक्यातील मादळमोही येथे वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती झाली आहे ती नुकतेच मादळमोही येथे रुजू झाले आहेत.

बीड तालुक्यातील लक्ष्मीआई तांडा व पंचक्रोशीतील बंजारा समाजातील पहिला शिक्षक होण्याचा बहुमान मिळवणारे शिक्षक म्हणजे...अंकुश राठोड होय. आणि त्यानंतर त्यांचे चिरंजीव आणि आमचे छोटे बंधू डॉ.ऋषिकेश अंकुश राठोड यांनी या तांड्यातून पहिला डॉक्टर होण्याची परंपरा कायम राखल्याने चर्चेचा विषय ठरला आहे. दि. ११ डिसेंबर २०२४ रोजी मादळमोही या ठिकाणी वैद्यकीय अधिकारी वर्ग- १ म्हणून नियुक्ती झाली आहे. या यशाबद्दल समाजातल्या अनेक स्तरातून या पिता-पुत्राचा स्वागत करण्यात येत आहे.

पहिल्याच प्रयत्नात एमबीबीएस डॉक्टर होणारा डॉ.ऋषिकेश राठोड थांबलेला नसून आयएएस अधिकारी होण्याचे स्वप्न उराशी बाळगून आहे...! वयाच्या अवघ्या २५ व्या वर्षी डॉक्टर होऊन आई वडीलांची इच्छा पुर्ण केली आहे. डॉ.ऋषिकेश पुढच्या ५ वर्षांत आयएएस अधिकारी होण्याचं आपलं स्वप्न पूर्ण करण्याची खुणगाठ उराशी बाळगून तयारी करतो आहे.त्यांचे हे दैदिप्यमान व ऐतिहासिक सुयशाबद्दल कौतुक होत आहे.

शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
ॲडव्हान्स ॲनोरेक्टल (पाईल्स )लेझर सेंटर
डॉ.प्रशांत श.ढाकणे
M.B.B.S. M.D.
(Anaesthesia)
भुलतज्ञ
डॉ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
B.A.M.S. M.S.(Shalya)
मुळव्याध, भगंदर व लेझर सर्जन
आपल्या बीड शहरामध्ये प्रथमच
महिला मुळव्याध तज्ञ
डॉ.सौ.मीरा प्र.ढाकणे (नागरे)
महिला रूगणांच्या तपासणी करीता उपलब्ध राहतील.
मुळव्याध करीता विशेष उपचार
- लेजर उपचार
- इंजेक्शन उपचार
- ऑपरेशन उपचार
- क्षारसुत्र उपचार
- मुळव्याध, भगंदर
- फिशर
- मलबध्दता
- संडासवाटे रक्तस्त्राव होणे
- बस्ती उपचार
- स्तनातील गाठी
- शरीरावरील सर्व प्रकारच्या गाठी
- स्तनामध्ये पु.होणे
- मोस, जामखीळ व कुरूप काढणे
- गर्भावस्था किंवा प्रसुतीनंतर
- मुळव्याध करीता विशेष आयुर्वेद उपचार
हॉस्पिटलचा पत्ता
शिवसमर्थ मुळव्याध हॉस्पिटल
साई कॉम्प्लेक्स, आदर्श नगर, डी.पी.रोड
बसस्टँण्डच्या पाठीमागे, डॉक्टर लाईन, बीड
मो.क्र.9623079009

# बीड जि.प.तील शिक्षण विभागात बोगस पगाराची खैरात :: महाराष्ट्र शासनाला करोड रुपयांचा चुना...?

(सुनिल सिरसाट):- जिल्हा परिषद बीड अंतर्गत असणा-या शिक्षण विभागामध्ये कायमच मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार व गैरप्रकार सुरू असतात आणि त्याच धरतीवर बीड शिक्षण विभागाने वेतनश्रेणीच्या आधारे शिक्षकांना साडे तीन महिन्याचे वेतन वितरित करत शासनाच्या पैशांचा चुराडा करून एक प्रकारे खैरातच वाटली आहे.

महाराष्ट्र राज्यातील अतिसंवेदनशील म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषद अंतर्गत असणारा शिक्षण विभाग महाराष्ट्रात अजब-गजबच आहे. मुन्नी बदनाम हुई डार्लिंग तेरे लिये...! या गाण्याच्या बोलाप्रमाणे शिक्षण विभागा अंतर्गत सातत्याने गैरव्यवहार-गैरप्रकार सुरूच असतात असतात आणि मग बीड जिल्हा परिषदेची बदनामी काय केल्या थांबत नाही. याच धरतीवर काही काळापूर्वी शिक्षण विभागाने जवळपास शेकडो शिक्षकांना अंदाजे सहा-सात कोटींच्या घरात पगार स्वरूपात बोगस खैरात वाटण्याचे काम केले असून तो गैरप्रकार जाणीवपूर्वक केला असल्याने अद्यापपर्यंत त्याकडे सर्वांचे दुर्लक्ष होते. परंतु सातत्याने समाजाचा आरसा म्हणून म्हणा की, जनतेचा विश्वास पात्र चौथा स्तंभ म्हणा...., दैनिक समर्थ राजयोग नेहमीच विश्वसनीय सूत्रांच्या आधारे अशा अनेक गैरप्रकार-व्यवहारा उघडकीस आणुन त्याचा छडा लावत असल्याने अलीकडच्या काळात बीड जिल्हा आणि दैनिक समर्थ राजयोग हे समीकरण फारच घट्ट बनले आहे.




तेंव्हा बीड जिल्हा परिषद अंतर्गत मुन्नी पेक्षाही जास्त बदनाम असलेला शिक्षण विभाग आणि या शिक्षण विभागात आजपर्यंत दाखल झालेले आणि बदली होऊन गेलेले वा निवृत्त झालेले कितीतरी महाप्रतापी अधिकाऱ्यांनी मोजता येणार नाहीत इतके गैरव्यवहार-गैरप्रकार करून ठेवलेले आहेत आणि सर्रास चालू आहेत. काही बोटावर मोजण्या इतपत प्रकरणांमध्ये वरिष्ठ लक्ष घालून थातुरमातुर कारवाई करतात. परंतु त्या तुलनेत शेकडो-हजारो प्रकरण तशीच दाबून थप्पी मारून ठेवली जातात. अधिकाऱ्यांप्रमाणे कितीतरी पुढारी-पालकमंत्री आले गेले. पण आत्तापर्यंत आपल्या मिनी मंत्रालयाची बदनामी संपूर्ण राज्यभर होत असून ती थांबावी म्हणून कोणीही विशेष प्रयत्न केलेले नाहीत. तेंव्हा शासन दरबारी जमा असलेला पैसा हा सर्वसामान्यांच्या खिशातूनच जमा झालेला असतो आणि तो पैसा जर अशारीतीने खैरातीच्या स्वरूपात वाटला जात असेल तर व्यक्तीनुरूप दरडोई कर्जाचा डोंगर कमी होणे तर सोडा, तो दिवसेंदिवस वाढतच जाईल आणि एक दिवस हे असे भ्रष्ट अधिकारी-कर्मचारी आणि शिक्षक मंडळी काय मजेत राहतील. परंतु कर्जापोटी सर्वसामान्यांच्या आत्महत्या दिवसेंदिवस वाढतच राहतील. मग अशा गैरप्रकारांना-गैरव्यवहारांना वेळीच आवर नाही घातला तर भविष्य तर अंधकारमय असेलच. परंतु याकडे खरच कधीच कुणीच लक्ष देणार नाही का....? हे महाप्रतापी कारनामे खरंच थांबणार नाहीत का.....?? की कुणालाही ते थांबवायचेच नाहीत. अशा कितीतरी प्रश्नांनी थैमान घातलेले असून आता दै.समर्थ राजयोग ने उघडकीस आणलेल्या या निंदनीय प्रकरणाची सखल चौकशी येणारे नवीन पालकमंत्री तरी तन-धनाने करतील का.....??? आणि आपल्या जिल्ह्याला लागलेल्या भल्या मोठ्या डागातील थोडा तरी भाग पुसण्याचे काम करतील का......???? हे पाहणे औत्सुक्याचे ठरेल......!

नेमके हे प्रकरण काय आहे ते सविस्तर वाचा उद्याच्या अंकात......!!

क्रमशः



महाराष्ट्र विधान परिषदेच्या सभापती पदाच्या निवडणुकीसाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत प्रा. राम शिंदे यांनी आज उमेदवारी अर्ज दाखल केला. याप्रसंगी मंत्री सर्वश्री चंद्रशेखर बावनकुळे, चंद्रकांतदादा पाटील, उदय सामंत, जयकुमार रावल आदी उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

संपादकीय

# कर्ज कर्तनकाळ!

कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे मॅन्युफॅक्चरिंग, ऊर्जा आणि घरबांधणी ही तीन क्षेत्रे. पण आपल्याकडे याच क्षेत्रांत बुडीत कर्जे अधिक.

देशाची प्रगती, पायाभूत क्षेत्राची झेप, विकासाची धोरणे इत्यादीबाबत आपणास बरेच काही सांगितले जात असले तरी वास्तव नक्की कसे आहे ते 'दि इंडियन एक्स्प्रेस'च्या विशेष वृत्तातून समोर येते. हा वृत्तांत बँकबुडवे आणि बुडीत खात्यात गेलेली कर्जे यांबाबत असून तो तपशील मिळवण्यासाठी 'एक्स्प्रेस'ला तब्बल चार वर्षे संघर्ष करावा लागला आणि विविध पातळ्यांवर माहिती-अधिकार अर्ज सादर करत करत त्यांसाठी 'केंद्रीय माहिती आयोगा'पर्यंत त्यासाठी धडक द्यावी लागली. वास्तविक हे बँकबुडवे कारखानदार आणि त्यांनी बुडवलेल्या कर्जांचा तपशील रिझर्व्ह बँकेने स्वत:हून सादर करायला हवा. रिझर्व्ह बँकेचे माजी गव्हर्नर रघुराम राजन यांच्या काळात असा प्रयत्न झाला. त्या वेळी ही बुडीत खात्यात जाणारी कर्जे दूर करण्याऐवजी राजन यांच्यावर पदावरून दूर जाण्याची वेळ आली. नंतर या पदी ऊर्जित पटेल आले आणि मुदत संपण्यापूर्वीच गेले. मग शक्तिकांत दास आले. ते तर तत्कालीन अर्थव्यवहार सचिव या नात्याने त्या वेळच्या- आणि विद्यामानही- सरकारचे निश्चलनीकरणकर्ते. सरकारचा महान, बुद्धिमान, दूरदृष्टीचा नोटाबंदीनिर्णय अमलात आणण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. त्यामुळे त्यांच्याकडून इतक्या काही पारदर्शीपणाची अपेक्षा करणेही अयोग्य होते. दास यांनी या मुद्द्यावर अपेक्षाभंग केला नाही. त्यामुळे माहिती अधिकाराचा आधार घेत 'एक्स्प्रेस'ने देशातील बड्या बँकबुडव्या कारखानदारांचा तपशील स्वत: मिळवला. तरीही ती माहिती पूर्णांशाने मिळाली नाही. पण जी काही हाती लागली त्यावरून परिस्थितीचे गांभीर्य लक्षात यावे.

म्हणजे २०१९ च्या ३१ मार्चपर्यंत देशातील एकूण बुडीत खात्यातील कर्जांची रक्कम तब्बल ९.३३ लाख कोटी रु. इतकी आहे. देशातील सर्वात मोठे, नामांकित बँक कर्जबुडवे उद्योगपती एकंदर ८.४४ लाख कोटी रु. इतकी महाकाय रक्कम बँकांस देणी लागतात आणि या बँका प्राधान्याने सरकारी मालकीच्या आहेत. या जवळपास साडेआठ लाख कोट रुपये कर्जांतील साधारण निम्मी रक्कम ही बुडीत खात्यात जाण्याच्या मार्गावर आहे. दुसरे असे की देशातील एकूण बुडीत खात्यात गेलेल्या/ निघालेल्या कर्जांत बड्या शंभर कर्जबुडव्यांचा वाटा ४३ टक्के (४.२ लाख कोटी रु.) इतका आहे. या शंभर श्रेष्ठ बुडव्यांत ३० उद्योगपती असे आहेत की त्यांच्या बुडीत खर्चाचा वाटा त्यात ३० टक्क्यांहून अधिक आहे. या उच्चकोटीच्या कर्जबुडव्यांत १५ कंपन्या या फक्त तीन उद्योगक्षेत्रांतील आहेत. मॅन्युफॅक्चरिंग, ऊर्जा आणि घरबांधणी या तीन क्षेत्रांतील विविध कंपन्यांनी बुडवलेली/ बुडीत खात्यात निघालेली कर्जे ५० टक्के इतकी आहेत. ही रक्कम होते ४.५८ लाख कोटी रु. इतकी गगनभेदी. कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा म्हणजे ही तीन क्षेत्रे. पण आपल्याकडे तोच नेमका पिचका निघाल्याचे दिसते.

**जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२४/८३८**
**कार्यालय नगर परिषद,अंबड**
**दिनांक :- १२/१२/२०२४**

अर्जदार श्री./ :- १) नारायण रामदास मापारी २) कांचन नारायण मापारी रा.वाळकेश्वर ता.अंबड जि.जालना प्रकरण :- सर्व्हे नं. ३४/२ प्लॉट नंबर ३९ सि.स.नं.२७५७ न.प.मि.नं.१८-१२१-३९ चे हस्तांतरण करणे बाबत.

सर्व जनतेस या जाहिनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८-१२१-३९ ) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला -----------येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतो ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे.जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासून (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा.नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चर्तु:सिमा
पुर्व :- गणेश गिते यांचा प्लॉट
पश्चिम :- ०९ मीटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण :- गजानन जोशी यांचा प्लॉट
उत्तर :- बाबुराव नाना वराडे यांचा प्लॉट

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अंबड**

# मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा - २ अभियान कर्जत येथील 'राजुरेश्वर विद्यालय' जिल्ह्यात प्रथम

रोहिलागड सर्कल/प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण व क्रीडा विभाग द्वारा 'भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजना' अंतर्गत 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा टप्पा २' हे अभियान महाराष्ट्र राज्यातील सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनांच्या शाळांकरिता राबविण्यात आलेल्या अभियानांतर्गत विजेत्या शाळांची यादी शासनाच्या पोर्टल वर प्रकाशित करण्यात आली.यात राजुरेश्वर शिक्षण संशोधन सेवा संस्था, जालना संचलीत अंबड तालुक्यातील कर्जत येथील राजुरेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा खाजगी व्यवस्थापनात जिल्ह्यात सर्वप्रथम क्रमांक आला आहे.

या अभियानात पायाभुत सुविधा, शासन ध्येय धोरण अंमलबजावणी, शैक्षणिक संपादणुक या तीन प्रमुख निकषांवर विविध मुद्द्यांतर्गत मुल्यमापन करण्यात आले होते.विद्यालयाने या सर्व निकषांवर चिकित्सक पणे अभ्यास केला व सर्व मुद्यांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली.त्यामुळे विद्यालय जिल्ह्यात सरस ठरले.विद्यालयाच्या या यशाबद्दल कृषीभूषण पांडुरंग तात्या डोंगरे, सचिव डॉ राहुल पाटील डोंगरे (भैय्या),शिक्षणाधिकारी(माध्यमिक ) मंगलताई धुपे, कैलास दातखीळ (प्राथमिक) ,डायटचे प्राचार्य डॉ.राजेंद्र कांबळे , प्रा.डॉ.येवते , उपशिक्षणाधिकारी विपुल भागवत ,डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.प्रमोद कुमावत , अधिव्याख्याता योगेश्वर जाधव , प्राचार्य सचिन देशमुख, गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण, रवी जोशी, शिक्षणविस्तार अधिकारी शिनगारे , महेश गोडबोले, केंद्रप्रमुख विष्णू , गायकवाड , निलोफर पटेल, प्रेरणा मोरे ,प्रा.सय्यद , जेष्ठ अधिव्याख्याता दराडे, बटुळे, सहा.प्रशासकीय अधिकारी राहुल




भालेकर, अंकुशनगरचे प्राचार्य डावखर, प्रा.अशोक गाढे , बागल , मुख्याध्यापक जनार्दन मुळे, कर्जत व पंचक्रोशीतील गावचे सरपंच, उपसरपंच, चेअरमन,सदस्य, पालक , गावकरी आदींनी विद्यालयातील सर्वांचे अभिनंदन केले आहे.

विद्यालयास मिळालेले पुरस्कार....महाराष्ट्र राज्याचा छत्रपती शिवाजी महाराज वनश्री पुरस्कार, पर्यावरणाचा जिल्ह्यातील पंचतारांकित शाळा,त्रितारांकीत शाळा, मतदार नोंदणी उत्कृष्ट महाविद्यालय ,२०२३ मध्ये मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा -१ तालुक्यातुन प्रथम असे विविध प्रकारचे पुरस्कार मिळालेले आहे.

विद्यालयाचे वैशिष्ट्य...

विद्यालयात अठराशेच्या वर विविध प्रकारचे वृक्ष असून जिल्ह्यातील एकमेव असा नक्षत्र वन प्रकल्प, घनवन वृक्षलागवड, सौरऊर्जा प्रकल्प, रेन वॉटर हार्वेस्टिंग, खुले अभ्यासिका केंद्र, स्पर्धा परीक्षा अतिरिक्त तासिका, कंपोस्ट खत निर्मिती प्रकल्प, सॅनिटरी पॅड वेंडर मशिन, विद्यार्थी सुरक्षीतेसाठी संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही निगराणी, सुविधा युक्त क्रीडांगणे, शैक्षणिक डिजीटल फ्लेक्स.

स्व.भिमरावजी पाटील डोंगरे आबांनी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी २००० साली विद्यालय सुरू केले.आबांच्या मार्गदर्शनाखाली विद्यालय गुणवत्ता पूर्ण शिक्षणासह क्रीडा, पर्यावरण, सामाजिक, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रात नेत्रदीपक कामगिरी करत आहे. विद्यालयाच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

डॉ.राहुल पाटील डोंगरे
सचिव, राजुरेश्वर शिक्षण संशोधन सेवा संस्था,जालना

प्राचार्य विलास टकले, प्रा.ओमप्रकाश घुगे, प्रा.सुभाष जिगे, प्रा.भरत शेरे, अंकुश वीर, छगन पवार, धनाजी जाधव, सचिन टेकाळे, सुनील चव्हाण, सुंदर बुनगे, ज्ञानेश्वर पैठणे, वैभव मुळी, अभिजीत उंडे, शिक्षकेतर कर्मचारी भिकन कोकणी, अशोक उगले, मनोहर मिसाळ, विलास घूले, वाल्मिक सपकाळ, विष्णू घुगे..

## सैनिकी मुलां-मुलींच्या वसतिगृहाला धान्य पुरवठा करण्यासाठी दरपत्रक सादर करावे

लातूर ।प्रतिनिधी

जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या सैनिकी मुलां-मुलींचे वसतिगृह येथे अंदाजे प्रतिदिन १०० विद्यार्थ्यांना दरमहा धान्य खरेदी करण्यात येते. यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व धान्य विक्रेता, व्यापारी यांनी १ जानेवारी, २०२५ ते ३० एप्रिल, २०२५ या कालावधीसाठी सर्व धान्याचे कमीत कमी चार महिन्याचे स्थिर भाव दरपत्रक जिल्हा सैनिक कलयाण अधिकारी, लातूर यांचे नांवे २४ डिसेंबर, २०२४ पर्यंत बंद पॉकेटमध्ये सैनिक मुलांचे-मुलींचे वसतिगृह लातूर येथे सादर करावे, असे लातूर जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी शरद पांढरे (नि.) यांनी कळविले आहे.

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे ऑनलाईन अर्ज भरण्यास ३१ डिसेंबरपर्यंत मुदतवाढ

**लातूर ।प्रतिनिधी**

**राज्य शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील शासकीय वसतिगृहासाठी पात्र परंतु रिक्त जागेअभावी वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांसाठी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना राबवविण्यात येते.**

या योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करून घेण्यासाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते. सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात शासकीय वसतिगृह तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी हींींिः//हारी.ारहरळीं.ास हे नवीन ऑनलाईन पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलवर योजनेचे नवीन व नुतनीकरणाचे अर्ज ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत भरण्याचे आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त शिवकांत चिकुर्ते यांनी केले आहे.

## डॉ.सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरुप' या समिक्षात्मक पुस्तकासाठी साहित्य अकादमी पुरस्कार

साहित्य अकादमी साहित्य पुरस्कारांची घोषणा



नवी दिल्ली ।प्रतिनिधी

मराठीतील सुप्रसिध्द समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांना 'विंदांचे गद्यरुप' या समिक्षात्मक पुस्तकासाठी मराठी भाषेकरिता साहित्य अकादमी पुरस्कार आज जाहीर करण्यात आला. अकादमीचे सचिव, के. श्रीनिवासराव यांनी साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा केली. देशातील साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च संस्था म्हणून नाव लौकिक असणाऱ्या साहित्य अकादमीने, येथील कॉपर्निकसमार्ग स्थित साहित्य अकादमीच्या रविंद्र सभागृहात वर्ष २०२४ साठी साहित्य पुरस्कारांची घोषणा केली. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत देशातील २१ प्रादेशिक भाषांसाठी साहित्य अकादमी साहित्य पुरस्कारांची निवड व घोषणा करण

# मराठवाडा वॉटर ग्रीड हा देवेंद्र फडणवीस यांचा ड्रीम प्रोजेक्ट या निमित्ताने मराठवाडा नक्कीच दुष्काळमुक्त होईल - आ.बबनराव लोणीकर

जालना ।प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली आहे ही घोषणा करत असताना कर्जमाफीच्या अनुषंगाने सरकारच्या समोर अनेक आव्हाने आहेत मराठवाड्यासह विदर्भातील अनेक जिल्ह्यांमध्ये शेतकरी आत्महत्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आहे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि अजित दादा पवार यांच्याकडून लोकांना अपेक्षा आहेत हे सरकार आमचा सातबारा कोरा करू शकता असा विश्वास लोकांमध्ये आहे आणि त्यामुळेच एकदा शेतकऱ्यांचा सातबारा सरसकट कोरा कराच अशी आग्रही मागणी देखील आमदार बबनराव लोणीकर यांनी आज विधिमंडळात मांडली.

मराठवाड्यावर कायम दुष्काळाचे सावट असते अशा परिस्थितीत जुनी सरकारी जेव्हा केव्हा दुष्काळ पडेल त्यावेळी विजेचे बिल माफ करण्याऐवजी त्या वीजबिलावरचं केवळ व्याज माफ करायचं किंवा त्या बिलावर लावण्यात आलेला दंड माफ करण्याचे काम करायचं परंतु राज्यात महायुतीचा सरकार आलं आणि तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्या नेतृत्वातील या सरकारमध्ये देवेंद्रजी




फडणवीस यांच्याकडे ऊर्जा विभागाचा कार्यभार सोपवण्यात आला देवेंद्रजी यांनी थेट निर्णय घेत शेतकऱ्यांचा संपूर्ण वीज बिल माफ करण्याचा क्रांतिकारी निर्णय घेतला आणि शेतकऱ्यांना मोफत वीज देण्याचा निर्णय घेतला त्याचाच परिणाम म्हणून महायुती सरकारला विक्रमी बहुमत मिळाले ही बाब आपण विसरून चालणार नाही.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा मराठवाडा वॉटर ग्रीड हा ड्रीम प्रोजेक्ट आहे त्यामुळे या योजनेला नक्कीच गती मिळेल असा विश्वास देखील यावेळी आमदार बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केला लोणीकर म्हणाले की इजराइलच्या धरतीवर मराठवाड्याचा खाली वाहून जाणार पाणी उजनीच्या धरणातलं पाणी मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यांमध्ये वळवून मराठवाड्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी प्रयत्न गरजेचे आहेत आणि मराठवाडा वॉटर ग्रीड माध्यमातून हा प्रयोग नक्कीच यशस्वी होऊ शकतो असा विश्वास देखील आमदार लोणीकरांनी यावेळी व्यक्त केला.



**नागपूर - हिवाळी अधिवेशन नागपूर येथे, महाराष्ट्र राज्याच्या लोकनेत्या ना.पंकजाताई साहेब मुंडे यांची भेट घेतली व विठ्ठल - रुखमाईची मुर्तीरुपी प्रतिमा भेट दिली.त्यांचा मंत्रिमंडाळात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन केले. तसेच ताईसाहेबांना पुढील कार्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी माझ्यासह भाजपा मा.जिल्हा उपाध्यक्ष अनिल चांदणे व भाजपा जिल्हा उपाध्यक्ष ओबीसी मोर्चा तथा पिंपळवाडी सरपंच गणेश बहिरवाळ आदी मान्यवर उपस्थित होते.**

# शिरूर कासार येथे 'विजय दिन' साजरा

मानूर ।प्रतिनिधी

भारत आणि पाकिस्तान या दोन देशांमध्ये १९७१ साली झालेल्या युद्धात भारताने मिळविलेल्या विजयाबद्दल शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौकामध्ये विजय दिवस साजरा करण्यात आला. ३ डिसेंबर १९७१ रोजी पाकिस्तानने भारतावर हल्ला केला होता. त्यानंतर भारतीय सैनिकांनी केलेल्या प्रतिहल्ल्यात पाकिस्तानच्या ९३ हजार सैनिकांनी शरणागती पत्करली होती. त्यामुळे भारतीय




सैनिकांच्या वतीने दरवर्षी विजय दिन साजरा करण्यात येतो. शिरूर का. येथील माजी सैनिक अशोक गिरी आणि श्रीमंत सानप यांच्या पुढाकारातून हा कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी एकता फाउंडेशन महाराष्ट्र राज्य चे संस्थापक अध्यक्ष तथा म.सा.प.संभाजीनगर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य जेष्ठ साहित्यिक अनंतजी कराड, सचिव गोकुळजी पवार, कोषाध्यक्ष शिवलिंगजी परळकर, एकताच्या सल्लागार तथा ७ वे एकता मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजक ड.भाग्यश्रीजी ढाकणे आणि दहिवंडीचे सरपंच कालिदासजी आघाव, एकताचे प्रदेश संघटक देविदासजी शिंदे, प्रवक्ता मल्हारी खेडकर, आयडॉल क्लासेस चे संचालक तथा एकताचे संस्थापक सदस्य मधुकर केदार यांच्यासह जेष्ठ पत्रकार विजयकुमार गाडेकर, प्रतिष्ठीत व्यापारी माऊली बडे, कांता रणखांब, प्रकाश भांडेकर, बाबासाहेब बडे टेलर, कैलास गायके, सोमिनाथ गायके यांनी पुष्पार्पण करत अभिवादन केले. कार्यक्रमास शिरूर शहर आणि परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

## मुख्याध्यापकांचे सुरक्षा व सुरक्षितता चे जिल्हास्तरीय प्रशिक्षण अंबड तालुक्यामध्ये संपन्न

अंबड ।प्रतिनिधी

दि. १३/१२/२०२४ रोजी जालना जिल्ह्यामध्ये मुख्याध्यापकांचे सुरक्षा व सुरक्षितता या उपक्रमाचे तालुकास्तरीय शिक्षकांचे प्रशिक्षण आयोजित केलेले होते हा उपक्रम महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद मुंबई व स्किल ट्री कन्सल्टिंग लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद संचालक आर.विमला मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यभर राबवण्यात येत असून जालना जिल्हा परिषद शिक्षणाधिकारी



(प्राथमिक) मा. कैलास दातखीळ सर यांच्या सूचनेप्रमाणे आज प्रशिक्षण देण्यात आले असून, स्वतः गटशिक्षणाधिकारी गोविंद चव्हाण साहेब ,अंबड शहागडकर साहेब, आटोळे साहेब विस्तारधिकारी, गंगावणे साहेब व तालुक्यातील सर्व केंद्रप्रमुख उपस्थित होते .या प्रशिक्षणाचा शाळेतील शिक्षकांना व विद्यार्थ्यांना फायदा होईल अशी अपेक्षा गटशिक्षणाधिकारी यांनी व्यक्त केली आहे.जिल्हा समन्वयक प्रशांत राठोड व विनोद राठोड, वन सिंग राठोड व त्यांच्या टीम ने ट्रेनिंग यशस्वीरित्या पार पाडली.

## युवराज शिंदेची पोलीस उपनिरीक्षकपदी निवड

मानूर ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या वतीने घेण्यात आलेल्या पोलीस उपनिरीक्षक पदाच्या परीक्षेत युवराज शिंदेंची निवड झाली आहे. शिरूर शहरातील सेवानिवृत्त लाईनमन भाऊसाहेब शिंदे यांचा मुलगा युवराज याने सन २०२१ मध्ये झालेल्या पोलीस उपनिरीक्षक पदाची परीक्षा दिली होती.सदरील परीक्षेचा निकाल लागला असून त्याचे प्रतीक्षा यादीत नाव आले होते.युवराजचे शिक्षण बी.ई केमिकल इंजीनियरिंग पर्यंत झाले असून त्यानंतर त्यांनी स्पर्धा परीक्षा करण्याचा निर्णय घेतला.२०२० साली त्यांनी पोलिस उपनिरीक्षक पूर्व मुख्य परीक्षा आणि मुलाखत दिली होती.२०२१ साली अंतिम निकालात फक्त एक गुणाने तो प्रतीक्षा यादीत राहिला होता.१२



डिसेंबर रोजी सन २०२१ पोलिस उपनिरीक्षक प्रतीक्षा यादी जाहीर झाली आणि त्यामध्ये युवराज शिंदेंची निवड झाली आहे.युवराजच्या निवडीचे सर्वस्तरातून स्वागत होत असून त्याने मिळविलेल्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात येत आहे.

## प्रा संतोष नागरे यांचे निधन

गेवराई ।प्रतिनिधी

येथील र भ अट्टल महाविद्यालयातील वरिष्ठ विभागाचे हिन्दी विषयाचे प्रा . संतोष साहेबराद नागरे यांचे दि . १८ रोजी सकाळी ९ च्या सुमारास हृदयविकाराने निधन झाले . मृत्यूसमयी त्यांचे वय ४५ वर्ष होते . ते अविवाहित होते .

गेवराई येथील लाड गल्लीत वास्तव्यास होते . अत्यंत शांत, मितभाषि, सुस्वभावी प्रा . नागरे यांच्या अचानक जाण्याने हळहळ व्यक्त केली जात आहे .



# सेवानिवृत्तांच्या ठेवी भारतीय स्टेट बँकेत सुरक्षित आहेत – जितेंद्र कर्णे

## स्टेट बँक ऑफ इंडिया राजुरीवेस शाखेत पेन्शनर्स डे व आरोग्य तपासणी शिबीर संपन्न

बीड ।प्रतिनिधी

सर्व सेवानिवृत्तांनी व त्यांच्या नातेवाईकांच्या ठेवी भारतीय स्टेट बँकेत सुरक्षित आहेत व जादा व्याज मिळविण्यासाठी ठेवाव्यात तसेच बँकेकडून सर्वांना सन्मानजनक वागणूक मिळेल अशी ग्वाही मुख्य व्यवस्थापक राजुरीवेस शाखा बीड श्री. जितेंद्र कर्णे यांनी पेन्शनर्स डे कार्यक्रमात दिली. मंगळवारी बँकेच्या प्रांगणात पेन्शनर्स अ‍ॅण्ड सिनीयर सिटीझन असोसिएशन व स्टेट बँक ऑफ इंडिया यांच्या संयुक्त विद्यमाने पेन्शनर्स डे चे आयोजन करण्यात आले होते. यावेळी जिल्हा शासकीय रुग्णालय व सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथीक मेडीकल कॉलेजच्यावतीने आरोग्य तपासणी शिबीर घेण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भास्करराव सरदेशमुख हे होते. प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषद बीडचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे, जिल्हा कोषागार अधिकारी परदेशी, बँकेचे मुख्य शाखेचे योगेश रेंदाळकर, आयुष विभागाचे डॉ.आनंद कुलकर्णी, डॉ.राख, डॉ.दुर्गेश जोशी, डॉ.सौ.मिना हांगे, डॉ.लिमकर आदी मान्यवर व मोठ्या प्रमाणात पेन्शनर्स व ज्येष्ठ नागरीक उपस्थित होते.




प्रास्ताविक संघटनेचे अध्यक्ष अ‍ॅड.पी.ए.गोरकर यांनी केले. त्यात त्यांनी पेन्शनर्स डे चे महत्व सांगून युट्युब, व्हॉटस अ‍ॅप, सोशल मिडीया आदीवरील फेक बातम्या व माहितीमुळे पेन्शनर्सना मानसिक तसेच आर्थिक धोका होत असल्याचे सांगितले.दिवंगत सेवानिवृत्तांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण केली.

श्री.जितेंद्र कर्णे यांनी सुरक्षित रक्कम व भरीव व्याज मिळण्यासाठी स्टेट बँकेत मोठ्या प्रमाणात ठेवी ठेवून सेवानिवृत्तांनी निश्चिंत रहावे तसेच ज्वॉईंट खाते व नॉमिनी तातडीने बँकेत येवून करुन घ्यावे. सर्वांना सन्मानजनक वागणूक बँकेकडून मिळेल. काही अडचण असल्यास शाखाधिकार्यांना भेटावे असे आपल्या मनोगतात व्यक्त केले.

मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री.सुरेश केंद्रे यांनी जिल्हा परिषद सेवानिवृत्तांना ई-कुबेर प्रणालीमुळे १ तारखेला निवृत्तीवेतन दिले जाते. काही समस्या असल्यास तात्काळ दखल घेतली जाईल असे आश्वासन दिले.जिल्हा कोषागार कार्यालयाकडे सेवानिवृत्ती वेतन मंजूर झालेले सेवानिवृत्त भेटत नाहीत, तसेच आयकर कपात करावे की न करावे या बाबत संबंधितांनी अर्ज द्यावेत असे जिल्हा कोषागार अधिकारी श्री. लहु गलगुंडे यांनी सांगितले. ज्यांचा हयातनामा नसेल त्यांचे निवृत्तीवेतन दिले जाणार नाही असे सांगून संबंधितांनी दखल घ्यावी असेही ते म्हणाले.मुख्य शाखेचे श्री.योगेश रंगदळे यांनी सांगितले की, अनेकजण व सोशल मिडीयातील काही प्लॅटफॉर्म वरील काही फेक बातम्यामुळे सायबर अ‍ॅटॅकला कारणीभूत ठरतात. त्यामुळे कोणीही अशा लिंक ओपन करु नये व त्याला प्रतिसाद देवू नये असे सांगितले.होमिओपॅथीक व आयुष विभागातर्फे डॉ.आनंद कुलकर्णी व डॉ.सौ.मिना हांगे यांनी आरोग्य विषयक मार्गदर्शन करुन आरोग्य पसायदान म्हटले. अध्यक्षीय समारोप करतांना संघटनेच्या कार्याचा गौरव करुन निवृत्तीवेतन मंजूर करणारे व प्रत्यक्षात देणारे यांचा पेन्शनर्स डेच्या निमित्ताने सन्मान केला. ही बाब कौतुकास्पद आहे त्यासाठी सर्व पदाधिकारी यांचे अभिनंदन कार्यक्रमाचे अध्यक्ष भास्करराव सरदेशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन उपाध्यक्ष इंजि.वझुरकर आर.व्ही.यांनी तर आभार प्रदर्शन सचिव विजयकुमार सर्वज्ञ यांनी केले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व मान्यवरांचे सत्कार हे संस्थेचे सचिव नंदकुमार झरीकर व त्यांचे सर्व सहकारी व संघटनेचे पदाधिकारी यांनी केले. या कार्यक्रमास डॉ.दुर्गेश जोशी, होमिओपॅथीचे विद्यार्थी, आयुष विभागाचे डॉक्टर, रक्तदान करणारे दाते आदींचा गुलाब पुष्पदेवून सन्मान करण्यात आला.

# राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथिनिमित्त अभिवादन व महाप्रसादाचे आयोजन

## सर्व समाज बांधवांनी सहभागी होऊन लाभ घ्यावा – अ‍ॅड.सुधीर जाधव

बीड ।प्रतिनिधी

**ज्या महापुरुषांचा आधुनिक भारताला अभिमान असायला हवा, त्यात राष्ट्रीय संत गाडगे बाबा यांचं नाव आल्याशिवाय राहत नाही. असे निस्वार्थ कर्मयोगी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ रोजी पुण्यतिथी आहे. त्या निमित्त पुतळ्यास अभिवादन व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून बीडकरांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन परिट धोबी समाजाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अ‍ॅड.सुधीर जाधव यांनी केले आहे.**



दरवर्षी प्रमाणे परीट धोबी समाजाच्यावतीने राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची पुण्यतिथी समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरी केली जाते. याही वर्षी राष्ट्रसंत गाडगे महाराजांची ६८ वी पुण्यतिथी शुक्रवार दि.२० डिसेंबर २०२४ रोजी साजरी केली जाणार असून या निमित्त बीड शहरातील गाडगे बाबा यांच्या पुतळ्यास सकाळी ११ वाजता अभिवादन करण्यात येणार असून त्यानंतर परिट समाजाचे सांस्कृतिक सभागृह मोंढा रोड, बीड येथे दुपारी १२.०५ वा. प्रतिमेचे पुजन करुन महाप्रसादाचा कार्यक्रम आयोजीत केलेला आहे. राष्ट्रसंत गाडगे महारांची पुण्यतिर्थी निमित्त महाप्रसादाच्या कार्यक्रमाला सर्व समाज बांधव व बीडकरांनी या दोन्ही कार्यक्रमांचा लाभ घ्यावा असे आवाहन परीट धोबी समाजाचे मराठवाडा विभागीय अध्यक्ष अ‍ॅड. सुधीर जाधव, माजी प्रदेश अध्यक्ष गणेश जगताप, शहराध्यक्ष अंबादास नवले, जिल्हा कार्याध्यक्ष रमेश घोडके, जिल्हाध्यक्ष श्रीमंत गोतावळे, शिवसेना उप जिल्हाप्रमुख अजय जाधव, पप्पु शिंदे, जिल्हा सचिव जगन्नाथ शिंदे, विलास जाधव, शहर सचिव जयंत राऊत, रवि जाधव, जिल्हा सचिव प्रविण साळुंके, मराठवाडा विभागीय उपाध्यक्ष संतोष पवार, युवक शहराध्यक्ष मंगेश घोडके, गणेश राऊत, जिल्हा कार्याध्यक्ष संजय साळुंके, उपाध्यक्ष शितल राऊत, जिल्हा उपाध्यक्ष जिजा शिंदे, कोषाध्यक्ष संतोष भालेकर, शहर - सहसचिव अतुल साळुंक, प्रा. विजय जाधव, संदीप जाधव, अमोल काळे, मनोज नवले, संजय नवले, शहर परीट धोबी समाज सेवा मंडळ व संत गाडगे बाबा तरुण परीट समाज सेवा मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे.

# माऊली नगरमध्ये शनिवारपासुन हरिनाम सप्ताह,नामवंत किर्तनकारांची होणार किर्तनसेवा

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील नगररोड, माऊलीनगर मध्ये प्रतिवर्षीप्रमाणे याहीवर्षी श्रीसंत वामनभाऊ, श्रीसंत भगवानबाबा, श्री विठ्ठल रुक्मिणी व हनुमान यांच्या मुर्ती प्राण प्रतिष्ठापना निमित्त शनिवार दिनांक २१ डिसेंबर २०२४ पासून अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ होणार आहे. या सप्ताहात विविध मान्यवरांचे प्रवचन व कीर्तनसेवा आयोजित करण्यात आली आहे.

दि. २१ डिसेंबर रोजी ह.भ.प. प्रल्हाद महाराज शास्त्री, संत भगवानबाबा वारकरी संस्था, होळ यांचे कीर्तन, दि. २२ डिसेंबर रोजी माजी शिक्षणाधिकारी ह.भ.प. डॉ.विक्रम महाराज सारुक, दि. २३ डिसेंबर रोजी ह.भ.प. पांडुरंग महाराज राख, टेंभुर्णी, मंगळवार दि. २४ डिसेंबर रोजी ह.भ.प.अक्षय महाराज पिंगळे बीड, बुधवार दि. २५ डिसेंबर रोजी ह.भ.प. ह.भ.प. प्रकाश महाराज साठे, सोनिमोहा, गुरुवार दि.२६ रोजी ह.भ.प. गणेश महाराज वारंगे, शुक्रवार दि. २७ डिसेंबर रोजी ह.भ.प. संतोष महाराज वनवे, बीड, यांचे कीर्तन होणार आहे. तर शनिवार दि. २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी १०.०० ते १२.०० या वेळात ह.भ.प. आदिनाथ महाराज शास्त्री, मठाधिपती, तारकेश्वरगड, यांचे काल्याचे किर्तन आयोजित करण्यात आले आहे. किर्तनानंतर महाप्रसाद होणार आहे.दैनंदिन सप्ताहात सकाळी व संध्याकाळी महापंगत होणार आहे. काल्याचा महाप्रसाद ऍड.राहुल आघाव यांचा राहणार आहे.

या सप्ताहाचे व्यासपीठ चालक ह.भ.प. विष्णु महाराज तांदळे चर्‍हाटा हॅवआहेत. सप्ताहात गायनाचार्य हभ.प.अंगद महाराज सोनवणे, अविनाश महाराज केदार, ह.भ.प. श्रीमंत महाराज तांदळे (बापु), ह.भ.प. वैजनाथ महाराज सानप, डमाळे सर, नामदेव मुंडे, श्रीराम सानप, वासुदेव काजळे, सुनील सानप, आश्रुबा सानप, भगवान सानप, छगन जाधव, घुगे चांगदेव, गाडे बंडू, गचांडे भास्कर, बटुळे सुभाष, वीर महाराज आदी उपस्थित राहणार आहेत. मृदंगाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज तांदळे आणि हार्मोनियम वादक म्हणून ह.भ.प. नामदेव महाराज मुंडे यांची उपस्थिती राहणार आहे. सप्ताहात दैनंदिन कार्यक्रमासह काकडा ह.भ.प. नारायण महाराज मिसाळ व ह .भ.प. अंबादास महाराज शिरसाट, रामायण वाचक व सुचकसेवा ह.भ.प. अरविंद महाराज देशमुख व ह.भ.प. राम बोबडे सर, राधानगरी व ह.भ.प. भास्कर महाराज वारे हे करणार आहेत. या सप्ताहात भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन माऊलीनगर भागातील ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

# बाळराजे पवारांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित आरोग्य शिबीराचा नागरिकांनी लाभ घ्यावा– सुशील जंवजाळ

गेवराई ।प्रतिनिधी

गेल्या विस वर्षांपूर्वी स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे स्वप्न गेवराईच्या दाखवुन ते स्वप्न मा.आ.लक्ष्मण आण्णा पवार यांच्या माध्यमातून साकार करणारे स्वच्छ गेवराई सुंदर गेवराईचे जनक लोकप्रिय लोकनेते बाळराजे दादा पवार याच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे तरी तालुक्यातील नागरिकांनी आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा असे आवाहन सुशील जंवजाळ, भगवान घुबार्डे, यांनी दिलेल्या प्रसिद्धि पत्रकात केले आहे



दिलेल्या प्रसिद्धीपत्रकात ते म्हमाले की गेवराई मतदारसंघातील लोकप्रिय लोकनेते बाळराजे दादा पवार यांचा शनिवार २१डिसेंबर रोजी विविध सामाजिक उपक्रमाने वाढदिवस साजरा करण्यात येणार आहे त्यांची जय्यत तयारी सुरु आहे तर बाळराजे पवार मित्र मंडळाच्या वतिने आरोग्य शिबीरात मधुमेह तपासणी,रक्तदाब तपासणी, हृदयरोग तपासणी, ई.सि.जी. तपासणी अशा रोग तपासणी करण्यासाठी डॉ.सुरज कोठावळे, डॉ.धनजय माने,डॉ.दिपक फाटक,डॉ.आनंद मोटे,डॉ. विशाल पवार, डॉ.प्रशांत गायकवाड, या वैद्यकीय आधिकारी यांच्या उपस्थितीत आरोग्य शिबीर घेण्यात येणार आहे तरी सर्व जनतेने दि.२१ डिसेंबर शनिवार रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौकातील छत्रपती शिवाजी महाराज व्यापारी संकुल येथे आरोग्य शिबीरात सहभाग घेऊन आरोग्य तपासणी करुन घ्यावी तसेच यांच ठिकाणी रक्तदान शिबीर सुध्दा घेण्यात येणार आहे तरी रक्तदान करण्यासाठी सर्व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे असे आवाहन मा.नगराध्यक्ष सुशील जवंजाळ, राजेंद्र राक्षसभुवनकर, भगवान घुबार्डे, राहुल खंडागळे,दादासाहेब गिरी,ब्रम्हदेव धुरंधरे, याहीया खॉन, राम पवार, संजय इगळे,मुन्नासेठ,कृष्णा काकडे,राजाभाऊ आर्दड, धम्मपाल सौदरमल, बद्दोदिन,छगन आप्पा हादगुले, किशोर धोडलकर, अरुण मस्के,जानमहमंद बागवान, आप्पासाहेब कानगुडे,भरत गायकवाड,जुनेद बागवान, इम्रान पठाण यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे

मतदार संघातील लोकनेते बाळराजे पवार यांचा वाढदिवसा निमित्त विविध सामाजिक उपक्रमाने साजरा करण्यात येणार आहे बाळराजे दादा पवार यांच्या वाढदिवसा निमित्त आरोग्य शिबीर, रुग्णालयात रुग्णाना फळे वाटप, विद्यार्थ्यांना शालेय साहित्यांचे वाटप, गरजु लोकांना बिलॅकट,रक्तदान शिबीर आयोजन करुन बाळराजे पवार यांचा वाढदिवस साजरा करण्यासाठी

# माता रमाई घरकुल योजनेतील थकीत हप्त्यासाठी मनपा आयुक्तांनी लावलेली सक्ती कर भरणा जाचक अट रद्द करा – जनहित युवा संघटना

लातूर ।प्रतिनिधी

अनुसुचित जाती नवबौद्ध घटकातील कच्चे घर असणाऱ्या नागरिकांचे पक्या घराचे स्वप्न पूर्ण व्हावे या उदार्थ हेतूने केंद्र शासन/ महाराष्ट्र शासन समाज कल्याण विभागाकडून माता रमाई आंबेडकर आवास योजनेतून स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून २०१२ पासुन सदरील योजना कार्यान्वित करण्यात आली या योजनेतून लातूर शहरात अंदाजे ३५०० लाभार्थ्यांना पक्या



घराचा लाभ मिळाला आहे.प्रलंबित अर्ज मंजूरी करीता लातूर शहर महानगर पालिकेकडून १०० टक्के कर भरणा भरूनच अर्ज मंजूर केलेले आहेत.या मंजूर अर्ज लाभार्थींना अचार संहिता व विविध कारणाने घरकुल बांधकामाचे हप्ते प्रलंबित ठेवण्यात आले आहेत तेव्हा सदरीत थकित हप्ते तातडीने देण्यात यावे अशी मागणी जनहित सेवा युवा संघटनेच्या वतीने आज दिनांक १८ डिसेंबर रोजी दुपारी दोन वाजता जिल्हाधिकाऱ्यामार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन देण्यात आले आहे.

# गेवराई शहरांमध्ये महावितरण कडून विजचोरीची मोठी कारवाई

गेवराई ।प्रतिनिधी

गेवराई शहरांमध्ये ज्या भागांमध्ये वीजचोरीचे मोठे प्रमाण आहे अशा भागामध्ये काल दि १७ रोजी महावितरण गेवराई यांनी मोठी कारवाई केली आहे. पुढील तीन ते चार दिवसाच्या काळात अशाच प्रकारचे आकडे बहाद्दरांवर कारवाई करून भा.दं.वि. १३५ नुसार गुन्हे नोंद केले जाणार आहेत अशी माहिती आमच्या



प्रतिनिधींना महावितरण कडून मिळाली. सध्या अतिभारामुळे आपला विद्युत पुरवठा सकाळी वारंवार खंडित होत आहे, त्यामुळे महावितरण विरुद्ध ग्राहकांचा रोष वाढत आहे. त्याबाबत महावितरण ला आमच्या प्रतिनिधींनी संपर्क केला असता त्यांनी विद्युत पुरवठा वारंवार खंडित होण्यामागिल प्रमुख कारणे सांगितली,

# अधिक सक्षम होण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान समजून घेणे आवश्यक - प्रधान सचिव ब्रिजेश सिंह

## नागपूर प्रेस क्लब येथे पत्रकारांसाठी विशेष व्याख्यान
## आपली पत्रकारिता 'रिअलटाईम' करण्यासाठी 'एआय' उपयुक्त

नागपूर ।प्रतिनिधी

माध्यमात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यक्तिला अधिक माहिती सक्षम होण्याचा मार्ग कृत्रिम बुद्धिमत्तेने म्हणजेच 'एआय' ने उपलब्ध करून दिला आहे. आपल्या मातृभाषेतून मिळणा-या ज्ञानाला ज्या मर्यादा होत्या, त्या मर्यादा आता 'एआय' च्या माध्यमातून कमी झाल्या आहेत. ज्या भाषेत आपल्याला माहिती हवी आहे, त्या भाषेत ती सहजरित्या उपलब्ध होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेपासून दूर राहण्याऐवजी तंत्रज्ञान समजून घेणे आणि आपल्या वापरातून ते अधिक परिपूर्ण करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांची आहे, असे प्रतिपादन माहिती व जनसंपर्क विभागाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह यांनी केले.

नागपूर प्रेस क्लब आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संचालक नागपूर कार्यालयाच्या वतीने 'आर्टिफिशल इंटेलिजन्स इन जर्नालिझम' (कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता) या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार तथा माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे अध्यक्षस्थानी होते. कार्यक्रमास नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे नागपूर - अमरावती विभागाचे संचालक डॉ. गणेश मुळे, माहिती संचालक किशोर गांगुर्डे, दयानंद कांबळे उपस्थित होते. श्री. ब्रिजेश सिंह म्हणाले, कोणतेही नवीन तंत्रज्ञान आले की नोक-या कमी होतील, अशी एक भीती व्यक्त होत असते. मात्र तंत्रज्ञानातून नवनवीन संधी निर्माण झाल्याची प्रचिती आपण आजवर घेत आलो आहोत. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या बाबतीतही अशीच भीती व्यक्त केली जात आहे.




वास्तविक याचा परिपूर्ण वापर जर करता आला नाही, तर संबंधितांना आपल्या नोक-या गमाविण्याची भीती अधिक आहे. हे माध्यम वापरतांना मात्र प्रत्येकाला अगोदर स्वत:ला सिध्द करावे लागेल. एआयच्या माध्यमातून जी काही माहिती आपल्यासमोर येईल, त्या माहितीला अधिक पडताळून घेणे, त्यात असलेल्या त्रृट्या दुरूस्त करून अधिक परिपूर्ण करणे, अशा माहितीला नैतिक व संवैधानिक दृष्टीने पडताळून पाहणे व दक्ष राहून चुका दुरुस्त करणे, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहिजे, असा इशाराही त्यांनी यावेळी बोलतांना दिला.आज विविध समाजमाध्यमांचा लोकांवर प्रचंड प्रभाव आहे. यात अनेक धोके आहेत. एखादी व्यक्ती गाफील राहून आपल्या मोबाईलवर आलेल्या चुकीच्या संदेशाला बळी पडला तर त्याला आर्थिक फसवणुकीलाही तोंड द्यावे लागते, याची अनेक उदाहरणे आहेत. यातील भीती बाजुला सारून आपण दक्ष असायला हवे. इतर प्राणीमात्रांबद्दल व्यक्ती म्हणून, माणूस म्हणून ज्या मानवतेच्या दृष्टीने आपण त्यांना पाहतो, त्याच दृष्टीमध्ये संवैधानिक व सत्य -असत्य या परिभाषेत सावध होत 'एआय' ला आपण जवळ केले पाहिजे. कोणतीही उत्सुकता ही ज्ञानाच्या स्त्रोतांपर्यंत आपल्याला घेऊन जात असते. पुर्वी या उत्सुकतेला आपण गुगलची जोड देऊन समाधान करून घेतले. आता या उत्सुकतेचे अधिक पुढचे पाऊल म्हणून एआय मार्फत मिळणा-या माहितीकडे पाहावे लागेल, असे त्यांनी सांगितले.अध्यक्षीय भाषणात माजी राज्य माहिती आयुक्त राहुल पांडे म्हणाले, आपल्यामध्ये मुळात असलेल्या गुणवत्तेसोबतच कृत्रीम बुध्दीमत्तेचा योग्य वापर करणे गरजेचे आहे. भारत विरोधी कृत्य करण्यासाठी एआय चा वापर होणार नाही, यासाठी एआय ची माहिती भारतीय पध्दतीने तयार करणे आवश्यक आहे. मराठी भाषेलासुध्दा एआय शी जोडावे लागणार आहे. तसेच अशा कार्यशाळांचे अधिकाधिक आयोजन व्हावे, अशी अपेक्षाही राहुल पांडे यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक नागपूर प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रदीप मैत्र यांनी केले. संचालन माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. गणेश मुळे यांनी तर आभार माहिती संचालक दयानंद कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार बाळ कुलकर्णी, धमेंद्र झोरे, भुपेंद्र गणवीर यांच्यासह विविध माध्यमातील पत्रकार, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे अधिकारी उपस्थित होते. तसेच राज्यातील जिल्हा माहिती कार्यालये आणि विविध पत्रकारिता संस्थांनी ऑनलाईन पध्दतीने व्याख्यानाचा लाभ घेतला.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे अभिनंदन

## समीक्षा क्षेत्रातील व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान

नागपूर ।प्रतिनिधी

**साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे मराठी समीक्षा क्षेत्रातील एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान होत आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी आनंद व्यक्त केला आहे. भारत सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाच्या राष्ट्रीय साहित्य संस्थेच्यावतीने साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा करण्यात आली. यात डॉ रसाळ यांच्या 'विंदांचे गद्यरूप' या समीक्षात्मक पुस्तकाला हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.**

शुभेच्छा संदेशात मुख्यमंत्री म्हणतात, डॉ रसाळ यांचे मराठी साहित्य विश्वातील योगदान अमुल्य असे आहे. मराठी भाषेचे अध्यापन, संशोधन, संपादन आणि समीक्षा असा त्यांचा चौफेर विहार राहीला आहे. विशेषत: त्यांचे मराठी काव्यविषयक संशोधनात्मक लेखन मौलिक असे आहे. समीक्षेतून कठीण विषय सहज-सुलभपणे समजावून देणारी त्यांची शैली नवोदितांना आश्वासक वाटते, यातच त्यांचे मोठेपण आहे. मराठी भाषा जतन, संवर्धन तसेच साहित्य विषयक चळवळीतील संस्था, समित्यांवरही डॉ रसाळ सक्रीयपणे कार्यरत आहेत. त्यांच्या समीक्षात्मक लेखनाला राष्ट्रीयस्तरावर मिळालेली ही दाद नव्या पिढीसाठी प्रेरणादायी ठरणार आहे. डॉ. रसाळ आजही तितक्याच तडफेने लेखन, संशोधनात कार्यरत आहेत. त्यांच्या हातून यापुढेही मराठी साहित्याची अशीच अखंडित सेवा घडत राहो. त्यांना उत्तम आरोग्य, दीर्घायुष्य लाभो या शुभेच्छांसह मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी डॉ. रसाळ यांचे अभिनंदन केले आहे.

साहित्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल ज्येष्ठ समीक्षक डॉ सुधीर रसाळ यांचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अभिनंदन केले आहे. या पुरस्कारामुळे मराठी समीक्षा क्षेत्रातील एका व्रतस्थ साहित्यिकाचा सन्मान होत आहे,

# जसं वारकऱ्यांचं पंढरपूर हे प्रेरणास्थान

## तसं सर्पराज्ञी हे निसर्ग निसर्गप्रेमींच पंढरपूर- ह.भ.प.अतुल महाराज शास्त्री

शिरूर कासार । प्रतिनिधी

जसं वारकऱ्यांसाठी पंढरपूर हे प्रेरणास्थान तसं निसर्गप्रेमींसाठी सर्पराज्ञी हे निसर्ग प्रेमींचं पंढरपूर असे मत सर्पराज्ञी निसर्गार्पण महोत्सवात कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलताना ह.भ.प.अतुल महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.ते पुढे बोलताना म्हणाले की, जगद्गुरु तुकाराम महाराज हे भगवंत प्रेमी होते, त्याआधी ते निसर्गप्रेमी होते. ज्याचं निसर्गावर पहिलं प्रेम होतंना त्याला भगवंत प्राप्त करण्यासाठी पंढरपूरला जाण्याची गरज नाही. त्याला स्वतः प्रत्यक्ष भगवंत भेटण्यासाठी येतो. सर्परांनी वन्यजीव पुनर्वसन केंद्र (तागडगाव), आनंदवन (मांडवे,) शुभंकर ऑर्गनायन (पाथर्डी)पर्यावरण संरक्षण व संवर्धन चळवळ (पाथर्डी) वन विभाग (बीड) यांच्या संयुक्त विद्यमाने सर्पराज्ञी निसर्गार्पण महोत्सव २०२४ आयोजन १४ डिसेंबर २०२४रोजी दत्त जयंतीचे औचित्य साधून व सर्पराज्ञी मार्गदर्शन आदरणीय क्षितिज हीर्लेकर यांच्या जन्मोत्सवानिमित्त प्रतिवर्षी सर्पराज्ञी निसर्गार्पण महोत्सव साजरा केला जातो. याहीवर्षी १४डिसेंबर २०२४ रोजी सर्पराज्ञी निसर्गार्पण महोत्सव २०२४ आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवामध्ये यावर्षी सर्पराज्ञीतील उपचारानंतर पूर्णपणे



बरे झालेल्या मोर, उद मांजर मांडूळ, अजगर, काळवीट आदी वन्यजीवांना निसर्गार्पण ह.भ.प.अतुल महाराज शास्त्री, सर्पराज्ञीचें संचालक सिद्धार्थ सोनवणे, सृष्टी सोनवणे वनपरिक्षेत्र अधिकारी अमोल सांगुळे, निसर्ग मित्र संदीप राठोड , अँड,समीर पठाण,शरद इंगवले, युवराज जगताप, राकेश पवार, सुधाकर ढाकणे, संतराम साबळे, गणेश कांबळे, अरुण खेडकर ,वनरक्षक बद्रीनाथ परजणे, शेळके , यदमल,आदींच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच २५ सर्पमित्रांना मोफत स्नेक स्टिकचे वाटप आदर्श शिक्षक लहू बोराटे यांच्या हस्ते करण्यातआले. ०अंध व्यक्तींना घरपोहोच पांढऱ्या काठीचे वाटप करण्यात आले. दुर्मिळ अति दुर्मिळ वृक्षची लागवड ही करण्यात आली. तसेच वन विभागात कर्तव्य करून सेवानिवृत्त झालेले वन कर्मचारी शिवाजी आघाव सेवापुर्ती सत्कार समारंभ करण्यात आला. या महोत्सवास बीड जिल्ह्यातूनच नव्हे तर पुणे,अहमदनगर, पाथर्डी ,शेवगाव, जालना आधी ठिकाणाहून निसर्गप्रेमींनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सर्पमित्र संजय गायकवाड यांनी केले

## मौजे कुंभेजळगाव ग्रामपंचायतीचा भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर : विकास गायकवाड

**गेवराई प्रतिनिधी (लोकदिशा न्यूज)**

**गेवराई तालुक्यातील मौजे कुंभेजळगाव ग्रामपंचायतीचा भ्रष्ट कारभार चव्हाट्यावर आणण्यासाठी महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष विकास गायकवाड यांनी २०२२ ते २४ या दोन वर्षाच्या कालावधी मध्ये झालेल्या १४ वा वित्त आयोगांचा व आत्तापर्यंत आलेला मागासवर्गीय यांच्या हक्काचा दलित वस्तीचा निधी कुठे व कसा खर्च झाला यांची माहिती व इतर कामाची माहिती माहितीच्या अधिकार कायद्यांतर्गत मागितली आहे**



**. कुभेजळगाव ग्रामपंचायत ही ग्रुप ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायत मध्ये ९** ग्रामपंचायत सदस्यांची संख्या आहे तरीसुद्धा विद्यमान सरपंच महोदयांनी आत्तापर्यंत एकाही मेंबरला विश्वासात न घेता १४ वा वित्त आयोगांचा निधी परस्पर विल्हेवाट केली आहे अशी माहिती समोर आली आहे व खुप दिवसापासून मासिक सभा किंवा ग्रामसभा घेतली नाही विद्यमान सरपंच हे पुण्याला वास्तव्यास असल्यामुळे सर्वसामान्य जनतेचे रहिवासी प्रमाणपत्र असो किंवा इतर कागदपत्रासाठी अतोनात हाल सहन करावे लागत आहेत लवकरच झालेले कामाची माहिती प्राप्त झाल्यावर सदर सरपंच महोदय व ग्रामपंचायतची संबंधित पदाधिकारी यांच्या विरोधात महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाच्या वतीने तहसील कार्यालय येथे आमरण उपोषणास बसणार आहे अशी माहिती महाराष्ट्र रिपब्लिकन पक्षाचे बीड जिल्हाध्यक्ष अध्यक्ष विकास गायकवाड यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे माहिती दिली आहे

# ऊस तोडणी कामगारांना देण्यात येणाऱ्या अग्रीम रक्कम व्यवहाराला कायद्याचे संरक्षण देण्यात यावे- आ.सुरेश धस

## मा राज्यपाल महोदयांच्या अभिभाषा वरील आभार आणि राज्य सरकारचे अभिनंदन प्रस्तावावर बोलताना केली मागणी

आष्टी (प्रतिनिधी)

साखर कारखाना व्यवस्थापन ऊसतोड कामगार कामगारांना अग्रीम उचल रक्कम देतात मात्र त्यासाठी वाहतूकदार आणि मुकादम यांना जबाबदार ठरवून त्यांच्याकडून कायदेशीर दस्तऐवज करून घेतात मात्र ऊस तोडणी कामगारातील काही कामगार हे कामाला न जाता अग्रीम रक्कम इतरत्र खर्च करतात ही रक्कम परत मिळवणे सहजासहजी शक्य होत नाही त्यातून अनेक पेज प्रसंग निर्माण होत असल्यामुळे अनेक मुकादमांनी वाहतूकदारांनी आत्महत्या केलेले आहेत त्यामुळे या उचल रकमे च्या व्यवहारास कायदेशीर संरक्षण मिळावे यासाठी अशासकीय विधेयक मांडणार आहे असे प्रतिपादन आमदार सुरेश धस यांनी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषण वर आभार व्यक्त करताना आणि राज्य सरकारच्या अभिनंदन प्रस्तावा प्रसंगी ते बोलत होते.

पुढे बोलताना आ.धस म्हणाले की,जेव्हा विरोधकांचे दिल के टूकडे हजार हुये कोई यहा गिरा कोई वहा गीरा अशी अवस्था झाली म्हणून आता त्यांनी जनतेला मारकडवाडी दाखविण्याचे काम केले. लोकसभा निवडणुकीमध्ये ३१ खासदार निवडून आले त्यावेळी त्यांनी ईव्हीएमला आक्षेप घेतला नाही आले मात्र विधानसभा निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीचा दारुण पराभव झाला त्या वेळी त्यांनी ईव्हीएमला दोष देण्याचे काम सुरू केले आहे हे रडगाणे असून दुर्दैवी असल्याचे सांगत आमदार सुरेश धस यांनी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी साहेब यांनी पंतप्रधान आवास योजना शहरी आणि ग्रामीण या दोन्हीसाठी घसघशीत वाढ केल्यामुळे गोरगरिबांची घरे तयार होणार असून त्यातून निवारा मिळणार आहे पी एम किसान सन्मान निधी हा शेतकऱ्यांना मोठा आधार असून त्याचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर होत आहे जलजीवन मिशन अंतर्गत ९०% योजना पाणीपुरवठा योजनांची कामे पूर्ण झाली असून




त्यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध व्हावा म्हणजे उर्वरित कामे पूर्ण करून लोकांना प्रत्येक घरी नळाद्वारे पाणी मिळणार आहे ही केंद्र आणि राज्य सरकारची मोठी उपलब्ध ठरणार आहे असे सांगत केंद्र आणि राज्य सरकारने आजपर्यंत राबविलेल्या विविध योजना आणि त्याचा सामान्य जनतेला झालेला फायदा याचा परिणाम म्हणून महाराष्ट्रातील जनतेने प्रचंड बहुमताने महायुती सरकारला पसंती दिली असल्याचे सांगत पश्चिम वाहिनीचे पाणी तुटीच्या गोदावरी खोऱ्यात लवकरात लवकर यावे आणि मराठवाडा सुजलाम सुफलाम करण्यात यावा अशी मागणी करीत त्यांनी मुख्यमंत्री सौर ऊर्जा पंप या योजनेअंतर्गत मागेल त्याला सौर कृषी पंप योजना,

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा दिल्याबद्दल केंद्र व राज्य सरकारचे अभिनंदन केले. तसेच, सर्व शासकीय कामकाज आणि व्यवहार मराठी भाषेतूनच व्हावा, अशी मागणी केली.मनरेगा योजना अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणारी रक्कम ही थेट त्याच्या खात्यात जमा करण्याची आवश्यकता आ.धस यांनी व्यक्त केली. छत्रपती संभाजीनगर ग्रीनफिल्ड द्रुतगती मार्गाला सरकारकडून परवानगी दिल्याबद्दल अभिनंदन केले.यासह आदी योजनांची अभ्यासपूर्ण केलेली मांडणी यावर सभागृहात उपस्थित सर्व सदस्यांनी बाके वाजवून त्यांना प्रतिसाद दिला... सभागृहात अशा विविध मुद्द्यांवर चर्चा करत सरकारच्या निर्णयांचे स्वागत करून त्यांच्या कार्याची प्रशंसा आ.सुरेश धस यांनी केली.

# डॉ.होमी भाभा बालवैज्ञानीक स्पर्धा प्रीक्षा मध्ये.२०२४.२५ खोलेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

सिरसाळा (प्रतिनिधी)

दिनांक १७.रोजी शैक्षणिक वर्ष २०२४.२५.या वर्षासाठी झालेल्या डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानीक स्पर्धा प्रीक्षा मध्ये खोलेश्वर विधालयातील तब्बल ६ विद्यार्थिनी यश संपादन केले आहे. या परीक्षेतील गुणवंत विद्यार्थी १) चि.पवन संदिप ठोंबरे २) चि. विशाल वैभव जाधव ३) चि. सार्थक नवनाथ फपाळ ४) चि. विवेक केशव पाटील ५) कु. संस्कृती कल्याण देशमुख ६)कु . संस्कृती नागेश कानडे गुणवंत विद्यार्थ्यांचे व सर्व मार्गदर्शक शिक्षकांचे विद्यालयाच्या वतीने खूप - खूप अभिनंदन..! व पुढील वाटचालीस शुभेच्छा.

आमचे योगेश्वरी परिवारातील श्री कल्याणराव देशमुख यांची कन्या कु संस्कृती कल्याणराव देशमुख हिने



इतर सहा मुलींनी डॉक्टर होमी भाभा बालवैज्ञानिक स्पर्धा मध्ये यश मिळवले ही स्पर्धा खोलेश्वर विद्यालय दिंद्रुड येथे आयोजित होती सर्व यश मिळवनार्या मुलीचे हा अभिनंदन पुढील वाटचालीस सर्व मुलींना शुभेच्छा त्यांचे स्वप्न साकार.तरी परिसरातील शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षण यांचा सत्कार व शुभेच्छा देण्यात आले आहे.

# सावरगाव मारखोळा येथे बिबट्याचा वावर गुरे चारणाऱ्या शेतकऱ्यांमध्ये घबराटीचे वातावरण

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सावरगाव येथे गुरे चारण्यासाठी गेलेल्या एका शेतकऱ्याला बिबट्याचे दर्शन घडल्याने या परिसरात अनेक बिबटे असण्याची शक्यता शेतकऱ्यांकडून व्यक्त केली जात असून त्या परिसरात शेतकऱ्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे हा परिसर जंगलमय असल्याने येथे बिबट्याचा वावर सारखा असतो याविषयी सविस्तर समजलेली माहिती अशी की सावरगाव शेंडगेवाडी पत्र्याचा तांडा धनगरवाडी पत्रे चा तांडा ते धनगरवाडी हे अहमदनगर जिल्ह्यात बीड जिल्ह्याच्या बॉण्ड्रीवर आहे परंतु शेंडगेवाडी मारखौळा जावळखोळा चार गावाचा येथे पॉईंट असलेल्याने शेतकरी ठेगळ यांची एक शेळी व दोन वर्षांपूर्वी याच ठिकाणी घनश्याम मस्के यांचे ३० ते ४० किलोची बोकड या बिबट्याने फस्त केले होते आता आठ दिवसापूर्वी नागू बोरुडे त्या ठिकाणी त्यांना दोन वाघिणीचे बछडे वाघीण याचे दर्शन झाले गुरुवार दिनांक पंधरा रोजी तीन वाजता नागू बोरुडे यांनी हे बछडे वाघीण पाहिले नतर घनश्याम मस्के यांना बोलवल्यानंतर स्वतः घनश्याम मस्के व पुतण्या भागीनाथ मस्केव मुलगा चैतन्य मस्के हे त्या ठिकाणी जाऊन फटकेचे वाजवुन भिंती दाखवत त्यांना पळवण्याचा प्रयत्न केला परंतु चार वाजेपर्यंत कसल्याच आवाजाला न घेता हे बछडे वाघीण त्या ठिकाणीच होती व नंतर हौसराव शेंडगे यांच्या ज्वारीच्या शेतात त्या दोन बछड्यांनी वाघिणीने शेतात पलायन केले केले. परी वन विभागाने हे बर्थडे मानव वस्तीत शिरण्याआधीच व मानवाला इजा होण्याआधी पिंजरे लावून यांना जेरबंद करावी



असे मागणी सावरगाव येथील सामाजिक कार्यकर्ते माजी सैनिक घनश्याम मस्के यांनी दैनिक महाराष्ट्र आरंभसी बोलताना व्यक्त केले

# वाल्मीक कराड माझ्या जवळचे आहेत तर आहेतच धनंजय मुंडे

परळी (प्रतिनिधी)

दिनांक १७.रोजी बीड जिल्ह्याच्या केस तालुक्यातील मसाजोग चे सरपंच संतोष देशमुख निर्गुण हत्या. प्रकरण सध्या राज्यभरात गाजत आहे. या हत्या प्रकरणात वाल्मीक अण्णा कराड. यांचं नाव आले आहे. वाल्मीक अण्णा. कराडे धनंजय मुंडे. यांच्या जवळचे मानले जातात. आज अखेर या विषयावर सभागृहावर धनंजय मुंडे पत्रकाराशी बोलले. त्यांच्या सख्ख्या भावाने धनंजय देशमुख यांनी स्वतः स्टेटमेंट केलं आहे. ते स्टेटमेंट केल्यानंतर अशा अतिशय घाणेरड्या घटनेत माझा लावण म्हणजे यांना कुठेतरी राजकारण आणायचं आहे. मुळात आत्ता हा विषय सभागृहात आणला. आदरणीय मुख्यमंत्री स्वतः यावर बोलणार आहेत. ही घटना का झाली?. कशी झाली? याला काय कारण आहे? कोण जबाबदार आहे? काय चौकशी झाली? किती आरोपींना अटक झाली? याबाबत मुख्यमंत्री स्वतः बोलणार आहेत.तोपर्यंत थांबा. वाल्मीक कराड माझ्या जवळचे आहेत तर आहेतच असे ही. धनंजय मुंडे म्हणाले. वाल्मीक अण्णा कराड यांच्यासोबत फोटो व्हायरल होतंय त्यावर धनंजय मुंडे म्हणाले की बीड जिल्ह्यातून अनेक जण येतात. फोटो काढतात. त्यामुळेच मला आज दीड तास उशीर झाला. त्यांना आमच्या सोबत फोटो काढायचा असतो. आम्हाला तो द्यायचा असतो ते त्या फोटोच व्यक्तिगत जीवनात काय करतात. याच्याशी आमचा काही संबंध येत नाही.असं धनंजय मुंडे म्हणाले. अशा घाणेरड्या प्रवर्तिला खून करणाऱ्या व्यक्तीला लोकांना आणि मदत करतोय आस. पाठबळ देतोय असं कधी जमलं नाही. आजपर्यंत राजकारणात. समाजकारणात इतक्या वर्षात असं कधी केलं नाही. असं धनंजय मुंडे म्हणाले. हे मी हाऊसचा अपमान केल्यासारखं या प्रकरणात कारवाई पहिल्या दिवशी झाली. चार आरोपींना अटक झाली. पोलिसांच्या आठ स्टीम तयार करण्यात आल्या.आहेत. आरोपींना अटक होईल. मी याविषयी जास्त बोलण्यापेक्षा आदरणीय मुख्यमंत्री जे गृहमंत्री आहेत. ते स्वतःच निवेदन करणार आहेत. त्यामुळे मी हाऊसच्या बाहेर बोलन मी हाऊसचा अपमान केल्यासारखं आहे असं धनंजय मुंडे म्हणाले.





सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार तथा गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड असणारे मा. श्री सुहासजी पालीमकर सर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देताना उद्योजक प्रवीण पालीमकर, समाजसेवक गाडे व इतर मित्र परिवाराने सुहास पालीनकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# आजी-माजी मुख्यमंत्र्यांची रंजक भेट राज्यात पुन्हा राजकीय भूकंप होण्याचे संकेत

परभणी/प्रतिनिधी

उबाठा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, आदित्य ठाकरे, अनिल परब, वरुण सरदेसाई, सचिन अहिर व अन्य आमदारांना सोबत घेऊन त्यांनी काल नागपूर येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या दालनात भेट घेतली. त्यावेळी उद्धव ठाकरे व देवेंद्र फडणवीस, या दोघा आजी-माजी मुख्यमंत्र्यां मध्ये सुमारे दहा ते पंधरा मिनिटे चर्चा झाली. सदर भेट फडणवीस यांची मुख्यमंत्रीपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी होती, असे वरकरणी सांगण्यात येत असले तरी, ही भेट राज्यातील राजकीय समीकरणे बदलत असल्याची चिन्हे आहेत, असे संकेत मिळत आहेत. तथापि या रंजक भेटीमुळे राज्यात सर्वत्र उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे, एवढे निश्चित !

दरम्यान, निवडणुकांचे निकाल जाहीर झाल्यानंतर सुमारे २५ दिवसांचा कालावधी उलटून गेला असून अचानकपणे झालेल्या उभय नेत्यांच्या या भेटीकडे अत्यंत कुतुहलाने बघितले जात आहे एवढे नक्की. शिवसेना पक्षप्रमुख



उद्धव ठाकरे यांनी नुकताच घेतलेल्या पहिल्या बैठकीत महाविकास आघाडीत राहावे, की, न राहावे, याविषयी पक्षाचे सर्व नेते, उपनेते, आमदार, खासदार व अन्य पदाधिकारी यांच्याकडून मते जाणून घेतली. त्यावेळी बराच खल शिजला असून अनेकांनी तर महाविकास आघाडीत राहणे, म्हणजे आपल्याला अत्यंत त्रासदायक ठरले जाईल, जणू असेच असे स्पष्ट संकेल दिल्याचे बोलले जात आहे. त्याचाच परिपाक म्हणून उद्धव ठाकरे यांनी पुन्हा कडवे आव्हान, हेच हिंदुत्वाचे धोरण असून ते स्वीकारण्याचा निर्णय घेतला व तसे वक्तव्य देखील त्यांनी जाहीरपणे बोलून दाखविले होते. किंबहुना त्याच पार्श्वभूमीवर त्यांची कालची ही भेट असू शकेल, जणू याच चर्चेला आमंत्रण देणारी ती ठरली आहे. त्या भेटीनंतर उद्धव ठाकरे यांनी विधानसभेचे सभापती नार्वेकर यानांही भेटले. त्यामुळे राजकीय क्षेत्रात आता या चर्चेला मोठे उधाण आले आहे. तर, दुसरीकडे तिकीटं, जागा, मंत्रिपदं व खातेवाटप, यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे या दोघांमध्ये सध्या तरी मोठा दुरावा निर्माण झाला आहे. अशा नाजूक परिस्थितीमध्ये या दोघांची झालेली भेट, ही शिंदे गटासाठी निश्चितच धोक्याची घंटा ठरू शकते. भाजपने सुध्दा एकनाथराव शिंदे व अजित पवार, या दोघांनाही सोबत घेऊन तत्कालीन मुख्यमंत्री राहिलेल्या उध्दव सरकारलाच खाली खेचले होते. पण महायुतीच्या या दोन्ही घटक पक्षांबाबत भाजपमध्ये आजही प्रचंड नाराजी आहे. याचे कारण म्हणजे त्यांची मातृ संघटना असलेल्या राष्ट्रीय स्वंयसेवक संघाने लोकसभा निवडणुकीनंतर त्यांच्या मुखपत्रातूनच सडकून टीका केली होती. या दोघांना सोबत घेतल्यामुळे आपला निवडणुकीत दारुण पराभव झाला, असा थेट आरोपही त्यांनी त्यावेळी केला होता. या सर्व घडामोडींवरुनच राज्यात पुन्हा एकदा मोठा राजकीय भूकंप होण्याची शक्यता वर्तविली गेल्यास आश्चर्य वाटू नये.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठवा - डॉ. संजय तांदळे

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या शिक्षकांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. तरी मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्यात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या प्राथमिक माध्यमिक शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्याकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. सदर पुरस्कार वितरण बीड शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन येथे मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये वितरित करण्यात येणार आहे

तरी राज्यातील सर्व पात्र शिक्षक आणि मुख्याध्यापकांनी प्रस्ताव ३१ डिसेंबर २०२४ च्या आधी पाठवावेत असे आवाहन मातृभूमी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. संजय तांदळे यांनी केले आहे. बीड शहरातील मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने मागील १६ वर्षांपासून सामाजिक भान ठेवून विविध सामाजिक प्रश्नावर आणि ते प्रश्न सोडवण्यासाठी त्याची जनजागृती करण्यासाठी काम केले प्रतिष्ठानच्यावतीने केले जात आहे.

त्याचबरोबर या प्रतिष्ठानच्या वतीने विविध क्षेत्रांमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींचा तसेच गुणवंत विद्यार्थ्यांचा यथोचित सन्मान केला जात आहे. आतापर्यंत मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने हजारो गुणवंतांचा यथोचित सन्मान करण्यात आलेला आहे. यावर्षी मातृभूमी प्रतिष्ठानच्या वतीने एक पाऊल पुढे टाकत शिक्षण क्षेत्रामध्ये उल्लेखनीय आणि भरीव काम करणाऱ्या व्यक्तींचा मान्यवरांच्या हस्ते राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले आहे. सदरील पुरस्काराचे स्वरूप, उत्कृष्ट मुमेंटो, लॅमिनेशन प्रमाणपत्र, शाल, पुष्पगुच्छ असे आहे. तरी या राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत प्रस्ताव मागवण्यात येत आहेत. परिपूर्ण प्रस्तावासह तीन पासपोर्ट फोटो असा प्रस्ताव मातृभूमी प्रतिष्ठानच्या कार्यालयात पाठवावेत अथवा प्रत्यक्ष द्यावेत. आपले प्रस्ताव अध्यक्ष मातृभूमी प्रतिष्ठान, समता कॉलनी मित्र नगर बीड येथे पाठवावे मो.नं. ९३०९१७३०७७, ९४२०५७७०८५

# ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने

## महावितरणची लकी डिजिटल ग्राहक योजना ऑनलाईन वीज बिल भरून बक्षिसे मिळवा




बीड ।प्रतिनिधी

महावितरणने ऑनलाईन वीज बिल भरणाऱ्या ग्राहकांचा टक्का वाढविण्याच्या हेतूने लकी डिजिटल ग्राहक योजना सुरू केली आहे. या योजनेसाठी ३१ मार्च २०२४ नंतर सलग तीन वेळा ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरणा करणारे सर्व लघुदाब वीज ग्राहक पात्र ठरणार आहेत. १ जानेवारी ते ३१ मे २०२५ या कालावधीत सलग तीन वा तीन पेक्षा अधिक वीज बिले भरून योजनेच्या लाभाची संधी ग्राहकांना उपलब्ध करण्यात आली आहे.

ही योजना महावितरणच्या अशा लघुदाब चालू वीजग्राहकांसाठी लागू असेल, ज्यांनी ०१ एप्रिल २०२४ पूर्वी मागील एक वर्ष म्हणजे ०१ एप्रिल २०२३ ते ३१ मार्च २०२४ या कालावधीत एकदाही वीज देयकाचा भरणा केलेला नाही किंवा ऑनलाईन वीज देयक भरणा पर्याय वापरलेला नाही. ग्राहकांना लकी ड्रा व्दारे स्मार्ट फोन, स्मार्ट वॉच अशी आकर्षक बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्राहकांनी ऑनलाईन पध्दतीने वीज बिल भरून लकी डिजिटल ग्राहक योजनेचा लाभ घ्यावा, असे महावितरणचे आवाहन आहे.ग्राहक रांगेत उभे राहण्यापेक्षा वेळ, श्रम व पैशांची बचत करीत डिजिटल पध्दतीने वीज बिल भरणा करण्यास प्राधान्य देत आहेत. ग्राहकांना डिजिटल पध्दतीने वीज बिलाचा भरणा करता यावा, यासाठी महावितरणकडून संकेतस्थळ, महावितरण मोबाईल पची सुविधा ग्राहकांना उपलब्ध करून दिलेली आहे. ग्राहकांना देय रक्कमेवर ०.२५ टक्के डिजिटल वीज बिल भरणा सूट दिली जाते. परिणामी सध्या राज्यात ७० टक्के हून अधिक वीज ग्राहक ऑनलाईन पध्दतीने वीज बिलाचा भरणा करीत आहेत. हे प्रमाण वाढविण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन देण्यासाठी लकी डिजिटल ग्राहक योजना राबविण्यात येत आहे.

महावितरणच्या प्रत्येक उपविभाग स्तरावर एप्रिल, मे व जून २०२५ या प्रत्येक महिन्यात एक प्रमाणे तीन लकी ड्रा ऑनलाईन पध्दतीने काढण्यात येणार आहेत. प्रत्येक लकी ड्रामध्ये पाच विजेत्यांना स्मार्ट फोन व स्मार्ट वॉच ही बक्षिसे दिली जाणार आहेत. योजनेच्या कालावधीत ग्राहकाने नेट बँकिंग, डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, यूपीआय, वॉलेट, कॅश कार्ड, एनएसीएच, क्यूआर कोड, एनईएफटी, आरटीजीएस इ. ऑनलाईन वीज बिल भरणा पर्याय वापरून लकी ड्रॉ महिन्याच्या अगोदर दरमहा एकप्रमाणे सलग तीन किंवा तीन पेक्षा जास्त महिने वीज बिल भरणे आवश्यक राहील. वीज बिलाची किमान रक्कम रु. १००/- असणे आवश्यक आहे. लकी ड्रॉ घोषित करण्यापूर्वीच्या महिन्याच्या अंतिम दिवशी ग्राहकाची थकबाकीची रक्कम दहा रपये पेक्षा कमी असावी. एक ग्राहक क्रमांक केवळ एका बक्षिसासाठी पात्र असेल.

## मस्साजोग सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणा तील आरोपी विष्णू चाटे यांना केली अटक

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख खुन प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे यांना गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने अटक केली आहे याबाबत सविस्तर माहीती अशी की,सध्या महाराष्ट्र राज्यात मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाचा विषय गाजत आहे.नागपुर येथील हिवाळी अधिवेशनातील सभागृहात सुद्धा हा विषय झाला.संतोष देशमुख यांची अत्यंत निर्घृणपणे हत्या करण्यात आली होती.बीड जिल्ह्या च्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख निर्घृण हत्या प्रकरणात आणखी एक आरोपी विष्णू चाटे याला पोलिसांनी अटक केली आहे.या हत्या प्रकरणातील अटकेत असलेल्या आरोपींची संख्या आता चार वर गेली आहे.विष्णू चाटे हा हत्या आणि खंडणी मधील आरोपी आहे.विष्णू चाटे याच्यावर हत्येचा कट रचल्याचा आरोप आहे. संतोष देशमुख यांची दि.९ डिसेंबर २०२४ रोजी अपहरण करून हत्या करण्यात आली होती. संतोष देशमुख यांची गाडी डोणगाव फाट्या वरील टोलनाक्या जवळ अडवली होती व सहा ते सात जणांनी त्यांचे अपहरण केले होते.तसेच त्यांना बेदम मारहाण करुन नंतर त्यांची निघृणपणे हत्या करण्यात आली होती.आतापर्यंत या प्रकरणात तीन आरोपींना अटककरण्यात आली होती व आता चौथा आरोपी अटक करण्यात आलेला आहे.

## शेतात गवत कापणी साठी गेलेल्या महिलेवर अत्याचार करणारा नराधम गजाआड

केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील एका गावात शेतात गवत कापणी साठी गेलेल्या एका महिलेवर नराधमाने लैंगिक अत्याचारकेल्याची धक्कादायक घटना घडली आहे.याप्रकरणी केज पोलिसांनी आरोपीला जेरबंद केले असुन गजाआड टाकले आहे.या बाबतची माहिती अशी की,मंगळवार दिनांक १७ डिसेंबर २०२४ रोजी दुपारी केज तालुक्यातील एका गावात २३ वर्षीय महिला ही घरा पासून जवळ असलेल्या शेतात गवत कापणीसाठी गेली होती.शेतात कोणी नसल्याचा गैरफायदा घेऊन कल्याण आश्रुबा चौरे या नराधमाने तिच्या पाठीमागून जात शेतात कोणी नसल्याचा गैर फायदा घेवून तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

दरम्यान पीडीतेच्या फिर्यादी वरून केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असून पोलिसांनी



आरोपी कल्याण आश्रुबा चौरे याला जेरबंद केले आहे. पोलिसांनी आरोपीला न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्याला दिनांक २०डिसेंबर पर्यंत दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.या प्रकरणी पिंक पथकाचे पोलीस उप निरीक्षक प्रकाश शेळके हे पुढील तपास करीत आहेत.दरम्यान या घटनेने परिसरात खळबळ माजली आहे.

# अधिकार नसताना जिल्हा परिषदेत नियमबाह्य केल्या बदल्या

## नियमानुसार कारवाईचे शासनाने काढले आदेश

बीड (प्रतिनिधी)

बीड जिल्हा परिषदेचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अधिकारांना नियमबाह्य बदल्या केल्या असून सदर प्रकरणी चौकशी करून कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. दरम्यान शासन आणि विभागीय आयुक्त आणि या संदर्भात तात्काळ अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

या संदर्भात म्हटले आहे की, दि. २८ जुन २०२४ रोजी जिल्हा परिषदेतील सहाय्यक प्रशासन अधिकारी सुनील नवले, जयलाल राजपुत, अनंत खेडकर, शिवाजी अदमुलवाड यांच्या आर्थिक लाभापोटी नियमबाह्य बदल्या करून आपल्या मर्जीतील संबंधित अधिकाऱ्यांना नियुक्त करण्यात आले आहे.

तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, बीड यांना प्रतिनियुक्ती व केव्हाही मनमानी बदलीचे अधिकार नसताना व विभागीय आयुक्त यांची पूर्व परवानगी न घेता जिल्हा परिषदेमध्ये सहाय्यक प्रशासन अधिकारी यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते राम खाडे यांनी दिं. १० जुलै २०२४ रोजी प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे तक्रार केली असता दि.१६ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र शासनाचे कार्यासन अधिकारी नितीन पवार यांनी




उपायुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड यांना नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या संदर्भात पत्र देऊन नियमानुसार कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. तथापि अद्यापपर्यंत जिल्हा परिषदेने यासंदर्भात सदरील नियमबाह्य पद्धतीने करण्यात आलेल्या बदल्या रद्द केलेल्या नाहीत अथवा कोणतीही कारवाई केली नाही.

शासनाच्या नियमानुसार विभाग बदलीसाठी ५ वर्षे सेवेचा कार्यकाळ पूर्ण करावा लागतो. सर्वसाधारण बदल्यासाठी १० वर्षे सेवाजेष्ठता ग्राह्य धरण्यात येते. प्रशासकीय बदलीसाठी १० वर्षे सेवा आवश्यक आहे. विनंती बदलीसाठी ३ वर्षे सेवा आवश्यक आहे. या व्यतिरिक्त बदल्यांसाठी विभागीय आयुक्तांची परवानगी आवश्यक आहे. किंवा न्यायालयाच्या आदेशाने बदली करता येईल. यापैकी काहीही कारण नसताना आर्थिक लाभ घेऊन आपल्या मर्जीतील अधिकाऱ्यांना नियुक्त करुन तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मनमानी कारभार केला आहे.

ह्या नियमबाह्य पद्धतीने केलेल्या बदल्यामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड काय कारवाई करतात? याकडे दबक्या आवाजात चर्चा रंगत असुन जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांचे लक्ष लागून आहे.

# राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजयने पटकावले सुवर्णपदक

बीड ।प्रतिनिधी

गोवा येथील पेडीएम स्टेडियम येथे पार पडलेल्या ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धेत सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय समाधान आत्तरकर याने सुवर्णपदक जिंकले आहे.तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मान्यतेने गोवा राज्य संघटना आयोजित ४ थी राष्ट्रीय ओपन तायक्कांदो स्पर्धा पेडीएम इंडोर हॉल गोवा येथे १२ ते १५ डिसेंबर २०२४ दरम्यान पार पडली. गोवा सरकारचे क्रीडामंत्री गोविंद गोंडे व तायक्कांदो फेडरेशन ऑफ इंडियाचे महासचिव ड. आर. डी. मंगेशकर, भारतीय संघटनेचे निरीक्षक संतोष मोहती (ओडीसा), महाराष्ट्र संघटनेचे अध्यक्ष डॉ. अविनाश बारगजे, आयोजित समितीचे सचिव महादेव चव्हाण, महाराष्ट्र संघटनेचे कोषाध्यक्ष व्यंकटेश कर्रा यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. यजमान गोवा राज्यासह महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्थान, केरळ, मध्यप्रदेश, आंध्रप्रदेश, तामिळनाडू, गुजरात, आसाम, ओडिसा, मनिपुर, नागालँड आदी राज्यातील ८०० खेळाडूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. या स्पर्धेत सर्वाधिक पदके जिंकून महाराष्ट्र संघाला विजेते पद मिळाले.या स्पर्धेमध्ये



सेंट अँन्स स्कूलच्या धनंजय आत्तरकरने सुवर्णपदक पटकावून शाळेचे नाव राष्ट्रीय पातळीवर उंचावले आहे व तसेच या स्पर्धेमध्ये प्रशिक्षक म्हणून शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस यांनी काम पाहिले. या यशाबद्दल शाळेचे प्राचार्या सिस्टर रोजमीन मॅथ्यू, समन्वय सिस्टर सुहीला, उपप्राचार्या सिस्टर शायनी, सिस्टर सुनीला शाळेचे क्रीडाशिक्षक शेख अनिस, शेख अफरोज, राहुल जंपलवार व सर्व शिक्षकांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## सरपंच संतोष देशमुख यांच्या खुनी शागिर्दांचे पाठीराखे, मार्गदर्शक आणि सूत्रधार (आका) यांना अटक झालीच पाहिजे

आष्टी (प्रतिनिधी) मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना अटक झालीच पाहिजे संबंधित प्रकरणातील शागीर्द, त्यांचे पाठीराखे आणि सूत्रधार (आका) यांना देखील अटक झालीच पाहिजे अशा घोषणा देत हातात फलक घेत आष्टी शहरातून बुधवारी सायंकाळी समाज, आ. सुरेश धस मित्र मंडळ आणि आष्टी शहर तसेच परिसरातील नागरिकांच्या वतीने कँडल मार्च काढत सरपंच हत्येच्या घटनेचा निषेध केला. बीड जिल्ह्यातील मस्साजोग येथील युवा सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या



प्रकरणातील काही आरोपींना अजूनही अटक झाली नाही, उर्वरित त्या सर्व आरोपींना अटक झालीच पाहिजे तसेच त्यांना फाशीचीच शिक्षा व्हावी या मागणीचे हातात फलक घेऊन आष्टी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक, शनी चौक, कमानवेस, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, बस स्टँड, महात्मा फुले चौक, महावीर चौक, अण्णाभाऊ साठे चौक, स्व.गोपीनाथराव मुंडे साहेब चौक मार्गे पुन्हा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे या कँडल मार्चची सांगता झाली.



## एक महीण्यात येडेश्वरी शुगर युनिट नंबर एकचे दोन लाख टन गाळप पूर्ण

**केज/प्रतिनिधी**

**केज तालुक्यातील आनंदगांव(सा) येथील येडेश्वरी साखर कारखाना युनिट नंबर एक ने दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी अकराव्या गळीत हंगामा ची सुरुवात केली.आणि दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी कारखान्याने दोन लाख टन गाळप करून ठरवलेल्या उद्दिष्टाकडे योग्य रीतीने वाटचाल चालू आहे.कर्मचा-यांनी एकमेकांचे अभिनंदन करून आनंद साजरा केला.येडेश्वरी शुगरच्या प्रत्यक्ष गाळपाला सुरुवात दि.१६ नोव्हेंबर २०२४ रोजी झाली होती.**

दि.१६ डिसेंबर २०२४ रोजी एक महिण्यामध्ये कारखान्याने दोन लाख टन गाळप करून साखरेचे उत्पादन ८७ हजार २५० क्विंटल घेतले.येडेश्वरी कारखाना प्रतिदिवस ७००० मे.टन सरासरी प्रमाणे गाळप करीत आहे.तसेच कारखान्याच्या आसवानी प्रकल्पात इथेनॉल १९ लाख ३७ हजार ३७४ लिटर व रेक्टीफाईड स्पिरीट ४६ लाख ७५ हजार ३४०लिटर उत्पादन झाले असुन सह वीज निर्मिती प्रकल्प सुद्धा चांगल्या पध्दतीनेसुरळीत सुरु असून दररोज ताशी १० मेगावॅट वीजनिर्मिती केली जाते.त्यात आज पर्यंत ९९ लाख ९७ हजार वीज युनिट निर्मिती झाली असून त्यापैकी ३९ लाख ७२ हजार ६०० युनिट महावितरण कंपनीला विक्री केली आहे. अकरावा गळीत हंगाम यशस्वीरीत्या चालवला जात आहे.या यशाबद्दल कारखान्याचे सर्वेसर्वा खा.बजरंग सोनवणे यांनी सर्व ऊसउत्पादकशेतकरी संचालक,सभासद,बिगर सभासद,तोडणी वाहतूक ठेकेदार व सर्व येडेश्वरी कारखान्याचे अधिकारी वर्ग व कर्मचारी यांचे दोन लाख मे.टन गाळप पुर्ण केल्याबद्दल अभिनंदन केले.व तसेच पुढील गाळप उद्धिष्ट पूर्ण करण्यासाठी सर्व कर्मचा-यांना प्रोत्साहित केले आहे.

# राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी अट्टल महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांची निवड

गेवराई ।प्रतिनिधी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथे संपन्न झालेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार स्पर्धेत गेवराई येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाच्या र. भ. अट्टल महाविद्यालयाचे विद्यार्थी विशाल निकम व आदेश घारगे यांनी इंजिनियरिंग व तंत्रज्ञान या प्रकारातून प्रथम क्रमांक पटकावला. बीड जिल्हा स्तरावरही या विद्यार्थ्यांना प्रथम पारितोषिक होते. आता विद्यापीठ स्तरावर झालेल्या या स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावल्यामुळे त्यांची निवड राज्यस्तरीय अविष्कार स्पर्धेसाठी झाली आहे.

त्यांच्या या यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे उपाध्यक्ष श्री. अमरसिंह पंडित यांच्याहस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रजनी शिखरे, आविष्कार समन्वयक प्रा. मधुकर वाडीकर, प्रा. सुनील भगत, प्रा. आदिती जाधव व प्रा. स्वाती होळकर यांची उपस्थिती उपस्थिती होती.

महाविद्यालयातील सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक आणि प्रशासकीय कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

